बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार,दि.१५ डिसेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक१२९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# याद्या ठरल्या!

मंत्रीपदाची शपथ कोण घेणार? | संभाव्य नावांच्या चर्चेला आले उधाण!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल लागून जवळपास तीन आठवडे उलटून गेले आहेत. मात्र, अद्याप मंत्रीमंडळ विस्तारासाठी मुहूर्त सापडलेला नाही. खुद्द मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी निकालानंतर १२ दिवसांनी शपथ घेतली. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस सरकारचा पहिला मंत्रीमंडळ विस्तार कधी होणार? याविषयी दावे केले जात असतानाच या मंत्रीमंडळ विस्तारात कोण शपथ घेणार? याचीही जोरदार चर्चा सध्या रंगताना पाहायला मिळालं आहे. याद्या तयार झाल्या असून केंद्रीय नेतृत्वाच्या मंजुरीची प्रतीक्षा असल्याचं विधान देवेंद्र फडणवीसांनी दिल्लीत केलं होतं. त्यामुळे आता संभाव्य नावांची चर्चा सुरू झाली आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) गृहमंत्रीपदासाठी आग्रही असल्याची चर्चा असून त्यासाठीच एकनाथ शिंदे शेवटच्या काही तासांपर्यंत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यास संमती देत नव्हते, असेही दावे केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर आता गृहमंत्रीपदाचा तिढा सुटल्याचं बोललं जात आहे. देवेंद्र फडणवीसांकडेच गृह खात्यासह अर्थखात्याचाही कारभार असेल अशी चर्चा आहे. एकनाथ शिंदेंकडे महसूल खात्यासह नगरविकास खातं जाऊ शकतं, तर दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण खात्याचा कारभार दिला जाऊ शकतो.



## महत्वाच्या गृहमंत्रीपदाचा तिढा सुटला

तिन्ही पक्षांच्या मंत्रिपदाचे चेहरे होणार स्पष्ट | महत्वाच्या खात्यांची कमांड राहणार मुख्यमंत्र्यांकडे

### एकनाथ शिंदेंच्या यादीत कुणाचा समावेश?
एकनाथ शिंदेंकडून पहिल्या मंत्रीमंडळ विस्तारामध्ये उदय सामंत, शंभुराज देसाई, गुलाबराव पाटील, दादा भुसे, प्रताप सरनाईक, संजय शिरसाट, भरत गोगावले, आशिष जयस्वाल व योगेश कदम या आमदारांची मंत्रीपदासाठी चर्चा आहे.

### भाजपाच्या यादीत कुणाचा समावेश?
दरम्यान, तिन्ही सत्ताधारी पक्षांच्या मंत्रीपदांच्या याद्या तयार झाल्याचं बोललं जात आहे. यात अनेक नावांची चर्चा पाहायला मिळत आहे. यात राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भारतीय जनता पक्षाकडून राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, पंकजा मुंडे, शिवेंद्रसिंह राजे भोसले, अतुल सावे, माधुरी मिसाळ, संजय कुटे, जयकुमार रावल, आशिष शेलार, रवींद्र चव्हाण, मंगलप्रभात लोढा, चंद्रशेखर बावनकुळे, अतुल भातखळकर, नितेश राणे व गोपीचंद पडळकर या आमदारांची नावं मंत्रीपदासाठी चर्चेत आहेत.

### अजित पवारांच्या यादीत कुणाचा समावेश?
सत्ताधारी महायुतीमधला तिसरा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) यादीतही संबंधित आमदारांची नावं असल्याची चर्चा आहे. त्यात छगन भुजबळ, धनंजय मुंडे, आदिती तटकरे, नरहरी झिरवाळ, अनिल पाटील, संजय बनसोडे व मकरंद पाटील यांना कॅबिनेट मंत्रीपद तर सना मलिक व इंद्रनील नाईक यांना राज्यमंत्रीपद मिळेल अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

## देशमुख कुटुंबीयांच्या लढाईत कायम सोबत
ऋणानुबंध:मुळूक,गलधर यांच्याकडून सांत्वन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत निर्दयीपणे हत्या केल्याची दुर्दैवी घटना चार दिवसांपूर्वी घडली. या घटनेचे बीड जिल्ह्यातच नाही तर राज्यभर पडसाद उमटले. जिल्ह्यातील जनतेने या घटनेचा तीव्र निषेध केला. दरम्यान शनिवारी (दि.१४) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. देशमुख कुटुंबियांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगून जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी देशमुख कुटुंबियांचे सांत्वन केले.
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे सोमवारी दुपारी अपहरण करुन हत्या करण्यात आली. घटनेनंतर देशमुख यांच्या हत्येचे जिल्हयात तीव्र पडसाद उमटले. या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी नऊ पान २ वर...

## बीडच्या कॅफेमध्ये रंगिल चाळे!
वेलडन: बीड शहर पोलिसांची धडाकेबाज कारवाई



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
शहरातील कॅफे फोरचे मालक विवेक सुधाकर जाधव यांनी एका अल्पवयीन मुलीला एका मुलासोबत एकांतवासात अश्लील कृत्य करण्यास बसू दिले. या प्रकरणाची खातरजमा करण्यात आली आणि व्हिडिओ शूटिंग पण करण्यात आली. यामुळे रितसर तक्रार नोंदवून यातील तो मुलगा आणि कॅफे मालक विवेक सुधाकर जाधव, राहणार संत नामदेव नगर, बीड यास अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर बाल लैंगिक अत्याचार कायदा याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पान २ वर...

## पोलीसांनो लोकमनाचा उद्रेक होईल असे वागू नका
संभाजीराजेंनी घेतली देशमुख कुटुंबाची भेट



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर अपहरण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. संतोष देशमुख यांचं अपहरण झाल्यानंतर त्यांचे कुटुंबिय, निकटवर्तीय व मित्र परिवाराने त्यांचा सर्वत्र शोध घेतला. मात्र, ते कुठेच आढळून आले नाहीत. त्यानंतर त्यांचा मृतदेह सापडला. हे प्रकरण आता चांगलेच पेटले असून आरोपींना शिक्षा मिळावी यासाठी राजकीय क्षेत्रातूनदेखील राज्य सरकारवर दबाव टाकला जात आहे. यादरम्यान संभाजीराजे छत्रपती यांनी आज (१४ डिसेंबर) संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणात लक्ष देण्याची विनंती केली आहे.मस्साजोग गावात संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेत्यानंतर माध्यमांशी बोलताना संभाजीराजे म्हणाले की, माझी मुख्यमंत्र्यांना विनंतीपूर्वक सूचना आहे की तुम्ही जातीने यामध्ये लक्ष घाला. अजूनही हा विषय हातातला आहे. पान २ वर...

### हत्येमागील कारण काय?
६ डिसेंबर रोजी मस्साजोग येथे अवादा पवन ऊर्जा या पवनचक्की प्रकल्पाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना घडली होती. त्या प्रकल्पावर सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे सुरक्षा रक्षक हे मस्साजोग येथील असल्याने सरपंच संतोष देशमुख यांनी प्रकरणात हस्तक्षेप केला आणि मारहाण करणार्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याचा राग मनात धरून अपहरणकर्त्यांनी त्यांचा खून केल्याचा आरोप होत आहे.

## शिंदेंच्या खास शिलेदाराचा भाजप गेम करणार?
चर्चा: मंत्रिपदासाठी पर्यायही शोधला?

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून २० दिवस उलटल्यानंतरही महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराला मुहूर्त मिळत नसल्याचे चित्र होते. अखेर महायुतीच्या नेत्यांची दिल्लीवारी, त्यानंतर बैठकांचे सत्र झाल्यानंतर आता मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूरमध्ये होणार असल्याची माहिती समोर येत आहे. रविवारी म्हणजे उद्या १५ डिसेंबर रोजी महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. नव्या मंत्रिमंडळाच्या माध्यमातून भाजप २०२९ च्या विधानसभा निवडणुकीसाठी तयारी करत आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या खास शिलेदाराला यावेळी मंत्रिमंडळातून डच्चू मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.महायुतीत भाजपचे आमदार सर्वाधिक असल्याने त्यांच्या वाट्याला



अधिक खाती येणार आहेत. भाजपने मंत्रिपदासाठी आपला फॉर्म्युला ठरवला आहे. अनेक ज्येष्ठ नेत्यांना मंत्रिमंडळातून डच्चू मिळण्याची शक्यता आहे. त्यांच्यावर पक्ष-संघटनेची जबाबदारी टाकण्यात येऊ शकते. त्यामुळे यावेळी मंत्रिमंडळात काही तरुण चेहरे बघायला मिळू शकतात. यातच आता एक मोठी बातमी समोर आली पान २ वर...

## लिंबागणेश गटात विकासकामाचे उदघाटन
आ.संदिप क्षीरसागर:रस्त्याच्या कामाचा शुभारंभ



बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागातील गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बेलखंडी फाटा-नागझरी ते नामाजी बुवा मंदीरापर्यंतच्या एकूण साडेसहा किलोमीटर डांबरी, एकूण साडेतीन कोटी रुपयांच्या रस्ता कामाचे उद्घाटन करण्यात आले.
दरम्यान निवडणुकीत विजयी झाल्यानंतर आ.क्षीरसागर पहिल्यांदा या भागात आल्यामुळे नागरिकांनी मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले. लिंबागणेश जिल्हा परिषद पान २ वर...

इफेक्ट | कामचुकार पोलिसामुळे संतोषचा जीव गेला!

# वादग्रस्त पोनि प्रशांत महाजन सक्तीच्या रजेवर!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी
मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरुन रोष दिवसेंदिवस वाढू लागला आहे. अशा परिस्थितीमध्ये ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे त्या पोलीस ठाण्यातील पी.आय. सह इतर अधिकाऱ्यांविषयी लोकांच्या प्रचंड तक्रारी आहेत. पोलिसांनी वेळीच दखल घेतली असती तर देशमुख यांची हत्या झाली नसती, असे देखील अनेकांनी बोलून दाखविलेले आहे. पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाशी संबंधीत केजचे पी.एस.आय. पाटील यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केली. मात्र पी.आय.


Page 6
14 Dec 2024
दैनिक बीड
पुण्यभूमी
केज पीआयचे निलंबन कधी?
सवाल:नागरिकांच्या तक्रारी असतांना पाठराखण
केज/पुण्यभूमी प्रतिनिधी
मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरुन रोष दिवसेंदिवस वाढू लागला आहे. अशा परिस्थितीमध्ये ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे त्या पोलीस ठाण्यातील पी.आय. सह इतर अधिकाऱ्यांविषयी लोकांच्या प्रचंड तक्रारी आहेत. पोलिसांनी वेळीच दखल घेतली असती तर देशमुख यांची हत्या झाली नसती, असे देखील अनेकांनी बोलून दाखविलेले आहे. पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाशी

महाजन यांच्या निलंबनासाठी लांबवालांबवी



का केली जात आहे? महाजन यांच्यावर कारवाई करायची नाही का? विनाकारण त्यांना पाठिशी का घातलं जात आहे? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. केज पोलीस ठाण्याचे पी. आय. महाजन यांच्याविषयी लोकांमध्ये प्रचंड रोष आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी दिरंगाई केल्याचा आरोप सातत्याने होत आहे. या संदर्भात पान २ वर...

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ते नंतर वादग्रस्त ठरलेले पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले असल्याचे कळत आहे. संतोष देशमुख यांच्या तपासात हलगरजी पणा केल्याचा त्यांच्या वर आरोप असून त्यांना निलंबित करा अशी मागणी केली जात होती या आगोदर पीएसआय राजेश पाटील यांचे निलंबन झाले आहे. त्यानंतर ही पोलिसांवर दुसरी कारवाई आहे.

## मलईदार खात्यांसाठी भांडणं!
राजकीय:मंत्रिमंडळ विस्तारावरून नाना पटोलेंचा हल्लाबोल

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
विधानसभेच्या निकालानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं असलं तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला नाही. आता १५ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याची चर्चा आहे. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यासाठी एवढा वेळ का लागत आहे? यावरून आता विरोधक अनेक सवाल उपस्थित करत आहेत. दरम्यान, काँग्रेसचे



प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही महायुती सरकारवर मंत्रिमंडळाच्या विस्तारावरून खोचक टीका केली आहे. महायुतीत मलईदार खात्यांसाठी भांडणं सुरु आहेत. मलईचं खातं कोणाला मिळेल? फक्त यासाठी सरकार काम करत असल्याचा हल्लाबोल नाना पटोले यांनी केला. तसेच परभणीत घडलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीच्या अवमानाच्या घटनेवरूनही त्यांनी राज्य सरकारवर टीका केली.परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान झाल्याच्या घटनेबाबत बोलताना नाना पटोले म्हणाले, परभणीतील घटनेचा आम्ही निषेध करतो. संविधान प्रतिकृती विटंबनेच्या घटनेप्रकरणी आम्ही सरकारकडे कारवाईची मागणी केली. मात्र, आज राज्यात तीन जणांचे जे सरकार आहे, पान २ वर...

## दक्षिणेतला दिग्विजयी

पहिल्या पाचातले दोन ग्रँडमास्टर मराठी होते. महिलांमध्ये पहिली आंतरराष्ट्रीय मास्टर मराठी होती. हे चित्र पुढे बदलले ते का, याचाही विचार यानिमित्ताने व्हाव.कोणत्याही खेळाप्रमाणे बुद्धिबळातही जगज्ञेतपद मिळवणे सोपे नाही. आजवर दीडेक डझन खेळाडूंनाच ते जमले. त्यात पुरुषांमध्ये १८व्या वर्षी निर्विवाद जगज्ञेतपद ही तर आणखी दुर्मीळ बाब. भारताच्या दोम्माराजू गुकेशने ही अपूर्वाई साधली आणि मूळ भारतीय म्हणवला जाणाऱ्या या खेळाची पाळेमुळे या भूमीत खऱ्या अर्थाने रुजली असल्याची प्रचीती आणून दिली. विश्वनाथन आनंद हा भारताचा पहिला जगज्ञेता. त्याचे साम्राज्य खालसा झाल्यानंतर ११ वर्षांनीच गुकेशने जगज्ञेतपद पटकावले. हे सगळे इतक्या लवकर घडून येऊ शकते, याची खात्री फारच थोड्यांना असावी. या थोडक्यांमध्ये स्वत: गुकेश होता हे महत्त्वाचे. दोम्माराजू गुकेश बुद्धिबळ जगज्ञेतपदाच्या लढतीत तोपर्यंत जगज्ञेता असलेला चीनचा प्रतिस्पर्धी डिंग लिरेनपेक्षा गुणांकनाच्या बाबतीत सरस होता. तरीदेखील अशा लढतींची स्वत:ची अशी वैशिष्ट्ये असतात. या लढतींमध्ये खेळण्याचा अनुभव अनेकदा गुणांकन किंवा इतर निकषांपेक्षा सरस ठरू शकतो. तो डिंग लिरेनकडे होता. डिंग लिरेन गेल्या वर्षी जगज्ञेता बनला. कारण त्याच्या आधीच्या वर्षी नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने पारंपरिक प्रकारात जगज्ञेतपदाच्या लढतींमधून 'निवृत्ती' जाहीर केली. त्याच्यासारख्या अपराजित आणि प्रतिभावान खेळाडूच्या माघारीमुळे बुद्धिबळविश्वात पोकळी निर्माण झालीच, तरी चुरसही वाढली. याचा फायदा घेणाऱ्यांमध्ये डिंग सर्वश्रेष्ठ ठरला. हा आणखी काही काळ जगज्ञेतपदावर राहू शकेल असे त्याच्याविषयी बोलले गेले. एरवी चिनी मंडळी ही मानसिकदृष्ट्या कणखर आणि भावनातीत थंड व्यवहारवादी मानली जातात. डिंग लिरेन अपवाद ठरला. उच्च स्तरावरील बुद्धिबळामध्ये सातत्याने चमकत राहण्यासाठी प्रचंड तयारीत राहावे लागते, मानसिक आणि शारीरिक ताणतणाव झेलावा लागतो. 'जगज्ञेत्या'कडून त्या प्रमाणात अपेक्षाही वाढलेल्या असतात. त्या अपेक्षांचे, तयारीचे, ताणाचे ओझे लिरेनला पेलवले नाही. जवळपास नऊ महिने तो सर्व प्रकारच्या बुद्धिबळापासून दूर होता. मानसिकदृष्ट्या कोलमडला होता. त्याच्या अवस्थेबद्दल त्याचे प्रतिस्पर्धीही त्याची कीव करू लागले होते. कार्लसनच्या मते, लिरेन जगज्ञेतपदाची लढत खेळूच शकणार नाही इतका कोसळला होता. त्यातून डिंग सावरला, खेळला. इतकेच नव्हे तर गुकेशला तोडीस तोड ठरला. तरीदेखील त्याच्या तुलनेत गुकेशमध्ये अधिक ऊर्जा आणि ईर्षा दिसून आली हे नाकारता येत नाही. अखेरच्या टप्प्यात ही गुणद्वयीच निर्णायक ठरली. त्याची डिंग लिरेनविरुद्धची लढत सध्या चर्चेत आहे. पण जगज्ञेतपद हा गुकेशच्या प्रदीर्घ वाटचालीतला केवळ एक टप्पा आहे. ते शिखरही नव्हे. खुद्द गुकेशला याची पुरेपूर जाणीव आहे. या वाटचालीचा धांडोळा घेणे आवश्यक.वर्षभर गुकेश उच्च दर्जाचे बुद्धिबळ खेळत आहे. त्याच्यासह तिघा प्रतिभावान भारतीय युवकांची चर्चा जगभर होते. आर. प्रज्ञानंद आणि अर्जुन एरिगेसी हे इतर दोघे. प्रत्येकाचे स्वतंत्र वैशिष्ट्य. प्रज्ञानंदने इतर दोघांपेक्षा कार्लसनला अधिक वेळा हरवून दाखवले आहे. अर्जुन इतर दोघांच्या आधी २८०० एलो गुणांच्या अत्युच्च पातळीवर जाऊन पोहोचला आहे. भारताचा विश्वनाथन आनंद आणि आणखी १४ बुद्धिबळपटूंनाच हे जमू शकले. या दोघांपेक्षा गुकेश लहान. तरीही गेली चार वर्षे तो जी परिपक्वता आणि तयारी दाखवत आहे, ते पाहिल्यावर 'हाच खरा आनंदचा वारसदार' असे कार्लसनसह अनेकांनी बोलून दाखवले होते. त्याचा जन्म उच्चशिक्षितांपोटी झाला, तरी दोन्ही पालकांना गुकेशसाठी सुरुवातीस खस्ता खाव्या लागल्या. १२व्या वर्षी तो ग्रँडमास्टर बनला. त्यानंतर जवळपास प्रत्येक वर्षी नवनवीन शिखरे तो सर करत आहे. मध्यंतरी कोविडमुळे सदेह बुद्धिबळ स्पर्धा जवळपास थांबल्या आणि ऑनलाइन स्पर्धांचे युग सुरू झाले. अनेक बुद्धिबळपटूंनी या काळात नशीब काढले. काहींनी पारंपरिक प्रकाराला सोडून अशा दूरस्थ बुद्धिबळातच कारकीर्द घडवण्याचा निर्णय घेतला. त्या वाटेने गुकेश फारसा गेला नाही. हे त्याला कोणी सांगितल्याची शक्यता कमी. कारण अल्प वयात गुकेश पोक्तांना लाजवेल इतका एकल निश्चयी आणि एकाग्र बनला. आपले लक्ष्य केवळ बुद्धिबळ जगज्ञेतपदच, हे तो खूप आधीपासून सांगू लागला. काहींना त्याच्या वक्तव्यात युवासुलभ उत्साह दिसला, तर काहींना त्या वयास साजेसे भानरहित अज्ञान. पुढे कोविडोत्तर सारे काही मार्गी लागल्यावर स्पर्धा होऊ लागल्या. त्या वेळी कार्लसनसकट अनेक आघाडीच्या बुद्धिबळपटूंना गुकेश त्याच्या वयापेक्षा किती तरी अधिक परिपक्व आणि स्थिरचित्त भासला. १६ व्या वर्षी तो २७०० गुणांच्या पलीकडे सरकला. १७ व्या वर्षी २७५० गुणांच्या टप्प्याला ओलांडणारा सर्वांत युवा बुद्धिबळपटू ठरला. पुढे १७ व्या वर्षीच कॅंडिडेट, १७ व्या वर्षीच आव्हानवीर आणि आता १८ व्या वर्षी जगज्ञेता. तिन्ही टप्पे नवा विक्रम प्रस्थापित करणारे. हे केवळ नशिबाने मिळत नाही आणि इतक्या प्रमाणात तर नाहीच नाही. त्यामागे साधना, आत्मविश्वास आणि निष्ठा असावी लागते. विश्वनाथन आनंदने गेली चार वर्षे त्याला काही प्रमाणात प्रशिक्षण देण्याची जबाबदारी उचलली. आनंदचा तो शिष्योत्तम ठरला यात आश्चर्य नाही. परवा अखेरचा डाव जिंकतो आहे याची जाणीव झाल्यानंतर गुकेशच्या चेहऱ्यावर टीनएजरला साजेसे हसू उमटले. पहिल्यांदाच. प्रत्यक्ष जगज्ञेतपद हाती आल्यानंतर भावनांचा बांध फुटला. पहिल्यांदाच. निर्जीव सोंगट्या आणि भावनाशून्य कम्प्युटरच्या संगतीत तासन् तास घालवूनही भावना बोथट झालेल्या नाहीत याचे त्याने अनाहूत घडवलेले दर्शन सुखावहच होते. अश्रुपात होत असताना सोंगट्या पुन्हा जागेवर रचून ठेवणे किंवा विजयवीराच्या पत्रकार परिषदेत सुरुवातीस आवर्जून प्रतिस्पर्ध्याचा उल्लेख करून त्यास गौरवणे या बाबींचे कुठे प्रशिक्षण मिळू शकत नाही. ही नम्रता श्रेष्ठत्वाच्या दंभापेक्षा किती तरी पट अधिक आचरावी अशीच. कदाचित, गुकेशच्या प्रत्यक्ष खेळापेक्षा असे क्षण त्याची उंची अधिक वाढवणारे ठरतात!

# भारतातील मानसिक आरोग्याचे धोरण आणि कायदे



जागतिक आरोग्य संघटनेच्या व्याख्येनुसार मानसिक आरोग्यामध्ये भावनिक, मनोवैज्ञानिक आणि सामाजिक कल्याण यांचा समावेश होतो, ज्याचा आकलनशक्ती, धारणा आणि वर्तन यांवर परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटने (डब्ल्यूएचओ) च्या मते, ही एक 'कल्याणाची स्थिती आहे ज्यामध्ये व्यक्तीला तिच्या क्षमतांची जाणीव होते. ती तिच्या जीवनातील सामान्य ताणतणावांचा सामना करू शकते. उत्पादक आणि फलदायीपणे कार्य करू शकते आणि तिचा समुदाय, तसेच व्यक्तिगत पातळीवर एखादी व्यक्ती तणाव, परस्पर संबंध आणि निर्णय घेण्याची क्षमता कशी हाताळते हे देखील ते ठरवते.भारतामध्ये मानसिक आरोग्य धोरण आणि कायद्याचा प्रवास हा टप्प्याटप्प्याने प्रगती करत आलेला आहे. या प्रवासाची सुरुवात १९ व्या शतकात झाली, जेव्हा ब्रिटीश कालखंडात काही मानसिक आरोग्य संस्थांची स्थापना झाली. १८९७ साली लागू झालेला इंडियन लुनासी क्ट हा कायदा मानसिक रुग्णांसाठी प्रथमच व्यवस्थात्मक दृष्टीकोन मांडणारा कायदा होता. मात्र, हा कायदा आजच्या दृष्टिकोनातून मागासलेला आणि अपुरा वाटतो. मात्र, त्या काळातील मानसिक आरोग्य व्यवस्थापन हे रुग्णांना वेगळे ठेवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करत होते. हा कायदा रुग्णांना 'लूनाटिक' म्हणजेच वेडसर म्हणून वर्गीकृत करत असे. यामध्ये रुग्णांच्या कल्याणापेक्षा नियंत्रणाला प्राधान्य होते. या कायद्याचा उद्देश हा मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना ओळखणे आणि त्यांना वेगळे ठेवण्यासाठी नियामक व्यवस्था तयार करणे हा होता. तसेच मानसिक रुग्णांसाठी आश्रयगृहांची (-ीूश्रीी) स्थापना करणे आणि त्यांचे प्रशासन ठरवणे आणि मानसिक आजारग्रस्त व्यक्तींवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांना समाजापासून विलग करणे हा होता. या कायद्याचा परिणाम असा झाला की मानसिक आरोग्यासाठी मूलभूत वैधानिक चौकट उपलब्ध झाली, परंतु ती मुख्यतः संस्थात्मक नियंत्रणावर आधारित होती. मानसिक आरोग्यासंबंधी कलंक आणि नकारात्मकता वाढीस लागली. तसेच उपचारांची मर्यादा, पायाभूत सुविधा, आणि रुग्णांचे अधिकार याकडे दुर्लक्ष झाले.भारतातील मानसिक आरोग्य क्षेत्राच्या ऐतिहासिक प्रवासाचा हा कायदा एक महत्त्वाचा टप्पा मानला जाऊ शकतो, जो मानसिक आरोग्याच्या सध्याच्या प्रगत धोरणांसाठी शिकवण ठरला आहे. १८९७ चा इंडियन लुनासी क्ट हा काळाच्या संदर्भात मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी पहिला टप्पा ठरला असला, तरी तो उपचारांपेक्षा विलगीकरणावर आधारित होता. हा कायदा मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी योग्य दिशादर्शक ठरला नाही. यावर आधारित अनुभव आणि चुका लक्षात घेऊन पुढे १९८७ आणि २०१७ चे कायदे अधिक सुस्पष्ट आणि मानवतावादी दृष्टिकोनात तयार करण्यात आले.१९८७ चा मानसिक आरोग्य कायदा : १९८७ चा मेंटल हेल्थ क्ट हा भारतात मानसिक आरोग्यासाठी लागू केलेला पहिला व्यापक कायदा होता. या कायद्याचा उद्देश मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना त्यांच्या उपचारांसाठी योग्य सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे हा होता. याने १८९७ च्या इंडियन लुनासी क्टची जागा घेतली, जो रुग्णांच्या हक्कांपेक्षा नियंत्रणावर अधिक भर देत असे. या कायद्यात मानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या उपचारांसाठी सुधारित आणि अधिक मानवीय दृष्टीकोन प्रदान करण्यात आला.

तसेच मानसिक आरोग्य संस्थांमध्ये रुग्णांच्या प्रवेश, उपचार, आणि सुटकेसाठी निश्चित प्रक्रिया तयार करण्यात आली. य कायद्याद्वारे मानसिक रुग्णांचे हक्क संरक्षित करण्यात आले आणि त्यांचे व्यक्तीचे कुठलाही प्रकारे शोषण होणार नाही याची उपाययोजना करण्यात आली. मानसिक रुग्णांना मानवी हक्क मिळावेत, यावर भर देण्यात आला. मानसिक रुग्णांच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही यासाठी कायदेशीर नियंत्रणाचे प्रावधान करण्यात येऊन रुग्णांची गैरवर्तन किंवा अत्याचारापासून संरक्षण देण्यात आले.या कायद्यामुळे मानसिक रुग्णांसाठी संस्थात्मक व्यवस्थापन सुधारण्यास मदत झाली. सामाजिक कलंक कमी करण्यासाठी सरकारच्या वतीने प्रयत्न झाले. मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढली. २०१७ च्या मेंटल हेल्थकेअर क्टच्या मार्गासाठी पाया घातला गेला, ज्याने १९८७ च्या कायद्याच्या मर्यादा ओळखून त्यावर उपाय मांडले. २००६ चा संयुक्त राष्ट्रांचा जाहीरनामा: मानसिक आरोग्य सेवांमध्ये जगभरात, भारतासह, निकृष्ट दर्जाची सेवा आणि मानवी हक्कांचे उल्लंघन सामान्य आहेत. अनेक देशांतील अहवालांमध्ये या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या हिंसाचार, अत्याचार, आणि जबरदस्तीचा उल्लेख आहे, ज्यामध्ये जबरदस्तीने रुग्णांना दाखल करणे आणि उपचार करणे, तसेच वेगळे ठेवणे आणि बंधनकारक उपायांचा समावेश होतो.संयुक्त राष्ट्रांच्या दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांसाठीच्या अधिवेशनाने (उठझऊ २००६) मानसिक आरोग्य सेवांमध्ये मानवाधिकार-केंद्रित बदलांसाठी एक चौकट प्रदान केली आहे. हे अधिवेशन त्या देशांवर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे, ज्यांनी यास मान्यता दिली आहे. अलीकडील संयुक्त राष्ट्रांच्या ठरावांमध्ये आणि अहवालांमध्ये मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील अस्वीकार्य मानवी हक्क परिस्थिती आणि मानसिक आरोग्य स्थिती असलेल्या किंवा मानसतज्ज्ञ सेवांचा वापर करणाऱ्या लोकांविरुद्ध होणाऱ्या उल्लंघनाचा स्पष्ट निषेध करण्यात आला आहे. मानसिक आरोग्य क्षेत्रातील निकृष्ट दर्जा आणि मानवी हक्कांचे प्रश्न यांची मोठी व्याप्ती ओळखून, जागतिक आरोग्य संघटनेने २०१३ मध्ये क्वालिटी राइट्स (टींरश्रळीूं ठळसहींी) या उपक्रमाची सुरुवात केली.

## विद्यार्थ्यांना करुन देणार मोफत नोटरी ;ॲड.राहुल सोळंके यांचे सर्वत्र कौतुक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्याची परिस्थिती पहिली तर महागाई व बेरोगारीने सर्वच लोक त्रस्त आहेत त्यातच १०० चा बॉण्ड बंद करून पाचशे रुपयाच्या बॉण्ड ची सक्ती पुन्हा टायपिंग खर्च करून नोटरी करावी लागते ही नोटरी करण्यासाठी बाहेर असणारे ऐजंट,दलाल ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना व अज्ञानी पालकांना स्वधार व इतर शैक्षणिक कामासाठी लागणाऱ्या नोटरी साठी आर्थिक पिळवणूक करून हजारो रुपये उकळत असल्याचे लक्षात आल्यामुळे एक सामाजिक बांधिलकी जपत गिरीबीची जाणीव असणारे माजलगाव येथील गंगामसाला या छोट्याशा गावातून बीड येथे शिक्षणासाठी आलेले व नुकतेच भारत सरकार नोटरी म्हणून नियक्त झालेले ड राहुल दिलीप सोळंके व ड अंकुश तांबे साहेब रा. तांबा राजुरी ता. बीड. यांनी विद्यार्थ्यांसाठी मोफत साधी नोटरी करण्याचा निर्णय घेतला आहे नोटरी साठी खालील नंबर वर संपर्क करा.९८२२५३२८५३,९९२२५३६७५३, ९३२५५३१७७६ या निर्णयाबद्दल बीड जिल्हा न्यालयातील ड राजेश शिंदे,ड तेजस वडमारे, ड फारुख शेख, ॲड. वंदना साळवे, पत्रकार सुनिलजी डोंगरे,संगमेश्वर आंधळकर, मल्हारी जाधव,तसेच शहरातील व ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी त्याच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.



## पान एक वरून

**देशमुख कुटुंबीयांच्या लढाईत**

तास रास्तारोको करण्यात आला. मानवी संवेदना हेलावून टाकणाऱ्या या घटनेचा विविध स्तरातून तीव्र निषेध करण्यात आला. दरम्यान शनिवारी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसैनिकांनी मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांची भेट घेऊन देशमुख कुटुंबिया सोबत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगितले. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या खून प्रकरणाचा तपास सीआयीडी मार्फत करावा अशी मागणी केली होती त्यानुसार या प्रकरणाचा तपास सीआयडी कडे देण्यात आला आहे स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात लक्ष घातल्याचे मुळुक यांनी यावेळी सांगितले.यावेळी केज युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, शहर प्रमुख बाळासाहेब पवार, युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, विकास काशीद केज तालुका सचिव, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, चंद्रकांत इंगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, युवासेना शहरप्रमुख आकाश चाळक, विभाग प्रमुख आकाश बहीर, शिवाजी गायकवाड, युवासेना उपतालुकाप्रमुख अजित गोरे, सरपंच बनसारोळा मनोहर गोरे सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

**बीडच्या कॅफेंमध्ये रंगिल**

तसेच फिर्याद मध्ये असा पण उल्लेख आहे की , इतरही कॅफेवर अशा प्रकारचे अश्लील कृत्याला परवानगी देण्यात येत असते. यामुळे शहरातील सर्व कॅफे आता या गुन्ह्याच्या तपासात अंतर्भूत झाली असून ज्या कॅफेमध्ये अशा प्रकारचे आक्षेपार्य जोडपे सापडतील त्यांच्यावर बाल लैंगिक अत्याचार कायद्याप्रमाणे कडक कारवाई करण्यात येणार आहे.सदरील कारवाई, श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ , सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबाजी राठोड, पोलीस अंमलदार गोरे, सुशेन पवार, मनोज परजणे सय्यद आशपाक यांनी केली आहे.

**पोलीसांनो लोकमनाचा**

लोकांच्या भावना मी ऐकल्या , उद्या काहीतरी स्फोट होईल तर मी जबाबदार असणार नाही. पोलीसांनी साडेतीन तास मजा बघत साधा गुन्हा नोंद केला नाही, आणि त्या वाल्मिक कराडवर गुन्हा नोंद करूनही तो इकडे तिकडे फिरतो आहे. हे सरकारला कसं चालतंय? असा सवाल संभाजीराजेंनी उपस्थित केला. मी पूर्णपणे ग्रामस्थांबरोबर आहे, जो ग्रामस्थ निर्णय घेतली त्याबरोबर संभाजीराजे असतील, असेही त्यांनी यावेळी जाहीर केले.संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. मस्साजोग गावतील नागरिकांकडून आक्रमक पवित्रा घेत आंदोलन केले जात आहे. गावकऱ्यांकडून आरोपांना तातडीने अटक करण्याची मागणी केली जात आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्याची मागणी देखील गावकरी करत आहेत. यानंतर बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मान्य करत गावकऱ्यांना आश्वासन दिले आहे. संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणात पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तर अद्याप दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

**शिंदेंच्या खास शिलेदाराचा भाजप**

आहे.ती म्हणजे बंजारा समाजाची पार्श्वभूमी असणारे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय राठोड यांना देखील भाजप पर्याय उभा करणार आहे. काही मतदारसंघात विशेषत: मराठवाडा, विदर्भात बंजारा समाजाची चांगली ताकद आहे. ही ताकद आपल्याकडे खेचण्यासाठी भाजपने प्रयत्न सुरू केले आहेत. भाजपने शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय राठोड यांना पर्याय म्हणून डॉ. तुषार राठोड यांना ताकद देण्याचा विचार सुरू केला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे, त्यामुळे यावेळी संजय राठोड यांना मंत्रिपदापासून दूर राहवे लागण्याची शक्यता आहे.डॉ. तुषार राठोड हे मुखेडचे आमदार आहेत. तुषार राठोड यांच्या स्वच्छ प्रतिमेचा फायदा घेत बंजारा समाजावर त्यांची पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न भाजपकडून होणार असल्याची चर्चा आहे. डॉ. तुषार राठोड यांचा मंत्रिमंडळात समावेश होऊ शकतो. त्यातून त्यांना अधिक बळ देता येईल, असा विचार भाजप नेतृत्वात सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. जर तुषार राठोड यांना मंत्रिपद मिळालं तर संजय राठोड यांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता कमी आहे.

**लिंबागणेश गटात विकासकामाचे**

गटातील डोंगरभागात असणाऱ्या गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे. येथील लोकांना सोयीसुविधेच्या उपलब्धतेसाठी वाहतूक व्यवस्था सक्षम असावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून ईजिमा ११५ ते नागझरी फाटा ते नामाजीबुवा मंदीरापर्यंत ०/०० ते ६/३०० च्या एकूण साडेसहा किलोमीटर अंतर असलेल्या डांबरी रस्त्याच्या कामाला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुरी मिळाली. शनिवार (दि.१४) रोजी या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांनी केला. या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरूवात करण्यात येणार आहे. या विकासकाम शुभारंभ प्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर, वैजनाथ नाना तांदळे, गोरख शिंगण, बाळासाहेब गोरे यांच्यासह जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाचे अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मलईदार खात्यांसाठी**

सरकारमध्ये मलाईच्या खात्यासाठी भांडणं सुरु आहेत. मलाईचे खाते कोणाला मिळतात? फक्त यासाठी सरकार काम करत आहे. मग या सरकारने प्रशासनाला जे काही आदेश दिले त्या आदेशाच्या जोरावर परभणीत लाठीचार्ज झाला. मग परभणीच्या जिल्हाधिकाऱ्यांना आणि पोलीस अधीक्षकांना लाठीचार्ज करण्याचे आदेश कुणी दिले होते? त्यामुळे यावर देखील कारवाई झाली पाहिजे, असं नाना पटोले म्हणाले.दिल्लीतील मोदी सरकार ज्या प्रमाणे शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्याचा प्रयत्न करतं. त्याप्रमाणे आता महाराष्ट्रात देखील घडतंय का? तसा संदेश देण्याचा प्रयत्न आहे का? पण आम्ही महाराष्ट्रात हे कदापि चालू देणार नाही. काँग्रेस महाराष्ट्रात हिटलरशाही चालू देणार नाही, असा इशाराही नाना पटोले यांनी महायुतीच्या सरकारला दिला. विधानसभेच्या निकालाबाबत बोलताना ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीचा निकाल ज्या प्रकारे आलेला आहे. त्या निकालाच्या धक्क्यातून लोक देखील बाहेर आलेले नाहीत. निकालाबाबत आजही अनेक ठिकाणी ग्रामपंचायतमध्ये लोक ठराव घेताना दिसत आहेत. तसेच बॅलेटपेपरची मागणी करत आहेत. आम्ही दिलेलं मतदान नेमकं कोणाला गेलं हे शोधण्याचं काम लोक करत आहेत, असंही नाना पटोले म्हणाले.विधानसभा निवडणुकीच्या निकालात काँग्रेसला आलेल्या अपयशानंतर नाना पटोले हे काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देणार असल्याची चर्चा होती. तसेच त्यांच्यावर पक्षातील काही नेत्यांनी टीका केली होती. दरम्यान, यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले, आरोप-प्रत्यारोप हे सर्व पक्षात सुरु असतात. राजकीय मतभेद फक्त काँग्रेसमध्ये आहेत असं नाही. त्यामुळे पक्षांतर्गत ज्या बाबी आहेत त्या पक्षातच सोडवल्या जातात. निवडणुकीत संपूर्ण काँग्रेस सहभागी झाता होता. त्यामुळे पक्षात कोणताही वादाचा विषय नाही तर निवडणुकीत आलेलं अपयश हा आत्मचिंतनाचा भाग आहे, असंही नाना पटोले यांनी म्हटलं.

**वादग्रस्त पोनि प्रशांत महाजन**

पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी स्वतः मस्साजोग येथील आंदोलकांसमोर बोलतांना पी.एस. आय.पाटील आणि महाजन यांच्याविषयी काही प्रकार कानावर आलेले आहेत, लोकांच्याही या विषयी तक्रारी आहेत. त्यामुळे पाटील यांना निलंबीत करण्यात येत असल्याचे सांगितले. एवढेच नव्हे तर पी.आय. महाजन यांच्यावरील कारवाईचा प्रस्ताव दोन दिवसात पाठविणार असल्याचे स्वतः पोलीस अधीक्षकांनी जमावासमोर सांगितले. मात्र अद्यापही महाजन यांच्यावर कसलीही कारवाई झालेली नाही. त्यांना साधे कंट्रोलला देखील ॲटॅच केलेले नाही, ते अजुनही तिथेच आहेत. या प्रकरणात विनाकारण लांबवालांववी करुन महाजन यांना वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे का? असा प्रश्न देखील उपस्थित होऊ लागला आहे.

## पान सहा वरून

**इस्त्रो अभ्यास सहलीसाठी**

संशोधन केंद्र या ठिकाणी अभ्यास सहलीला जाण्याची संधी मिळते.शहरातील सिंधफणा पब्लिक स्कुल माजलगाव याठिकाणी इ.८वी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी चि.ओजस अनिल कुलकर्णी याची या वर्षी निवड झालेली आहे,विशेष म्हणजे या परीक्षेत त्याच्या इयत्तेतून तो महाराष्ट्रातुन ३ रा क्रमांक आला आहे, शिवाजी नगर माजलगाव येथे राहणारे जि.प.शिक्षक अनिल सुभाषराव कुलकर्णी (नागडगावकर)यांचा तो मुलगा आहे.त्याच्या या यशाबद्दल त्याचे शाळेद्वारे व समाजातील सर्व माध्यमाद्वारे कौतुक करण्यात येत आहे.

**वाळुमाफीयांचे पाठीराखे**

परिसरातील शेतकऱ्याकडून व्यक्त केली जात आहे. परंतु चिंचोली माळी बीट अंमलदार तसेच मोठ्या नदी परीसरातील मंडळ अधिकारी तहसीलदार व महसूल विभागाचे नेमलेले पथक वाळूमाफ्याच्या दावणीला आहे का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे.

**स्वाभिमानी धम्म परिषद**

संतोष बनसोडे अशोक बनकर करणार आहेत तर आभार प्रदर्शन एल एन मस्के करणार आहेत. धम्म परिषदेसाठी उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष सुगंधराव इंगळे अशोक बोरुडे आनंद मेढे महिला जिल्हाध्यक्ष वैशालीताई अहिरे अरुणा पंडित सपना गायकवाड प्रबुद्ध भारतचे जिल्हा प्रतिनिधी अप्पासाहेब मकासरे हरेगाव ग्राम शाखाचे संजय महाले समता सैनिक दल सर्व केंद्रीय शिक्षक केंद्रीय शिक्षिका बौद्धाचार्य श्रीरामपूर राहुरी नेवासा कोपरगाव संगमनेर अकोले राहाता तालुका शहर व ग्राम शाखा आदींनी केले आहे.

**केज शहरात दत्त जयंती**

अध्यक्ष म्हणून जाधवर मॅडम ,मुंडे मॅडम, वाघमारे मॅडम व गायकवाड सर उपस्थित होते. राहुल मुंडे प्रतिष्ठानचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण वाघमारे, अशोक लांडगे ,समर्थ पारखे, ओम केदार ,सुनील शिंदे ,योगेश गायकवाड , ओम काळे,अजय मैंद व रुद्र तांदळे यांनी परिश्रम घेतले.

**निवडणूकांवर प्रश्नचिन्ह केला**

अभियान सुरू केले आहे. येणारा काळ काँग्रेस पक्षचा आहे त्यामुळे सर्वसामान्य लोकांसाठी कामे करा यापुढच्या निवडणुका आता आपल्या कार्यकर्त्यांसह व त्यांच्यासाठीच लढायच्या आहेत प्रत्येक वेळी आपल्यावर जागा वाटपात अन्याय होतो मात्र आता आपण आपल्याच चिन्हावर या निवडणुका लढणार असल्याचे रजनीताई पाटील यांनी सांगितले.

**महाकाली मंदिरात**

त्यानंतर दत्त जन्माचा पाळणा गात आनंदोत्सवात दत्तजयंती उत्सव साजरा करण्यात आला. दत्तात्रय व महाकाली ची गाणी गात जागर रात्रभर चालला. दिवसभराच्या या सर्व कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठया संख्येने हजेरी लावली होती. मंदिराचे पुजारी सतिश महाराज व भक्तगणांनी या सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अँन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## वेचक

### आर्य गुरुकुलचा भव्य क्रीडा दिन उत्साहात

**कल्याण :** आर्य गुरुकुल, कल्याणने गुरुवारी त्यांच्या शाळेच्या मैदानावर त्यांचा बहुप्रतीक्षित वार्षिक क्रीडा दिन-खेळ मेळा मोठ्या उत्साहात आणि ऊर्जेने आयोजित केला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा १००% सक्रिय सहभाग दिसला. पारंपरिक शपथविधी, शालेय ध्वजारोहण, एनसीसी कॅडेट्सचा मार्चपास्ट आणि मशाल प्रज्वलित करून, ऑलिम्पिक उद्‌घाटन कार्यक्रमाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गार्ड ऑफ ऑनर आणि ध्वज फडकावल्याने उपस्थित सर्वांमध्ये खिलाडूवृत्तीची भावना प्रज्वलित झाली. प्रमुख पाहुणे, लेफ्टनंट कमांडर डॉ. हरीश कुमार दुबे, व्हीपी ऍडमिन आणि सहाय्यक. बी.के. बिर्ला महाविद्यालय, कल्याण, प्राध्यापक (भौतिकशास्त्र) यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन समारंभपूर्वक मशाल पेटवून केले आणि बालपणात शारीरिक तंदुरुस्ती आणि सांघिक कार्याचे महत्त्वयाविषयी प्रेरणादायी शब्दात उपस्थितांना संबोधित केले.



### उल्हासनगरात बसचालकांची तपासणी

**उल्हासनगर :** कुर्ला परिसरात बेस्ट बस चालकाकडून झालेल्या अपघातामुळे उल्हासनगर महापालिकेनेही खबरदारी म्हणून परिवहन सेवेतील बस चालकांच्या कामाची आणि त्यांच्या आरोग्याची माहिती घेण्यात येईल, त्यांच्या आरोग्याची तपासणी आणि कामाचा अहवाल घेतला जाईल, अशी माहिती मनपा परिवहन सेवा विभाग प्रमुख विनोद केणी यांनी दिली. तसेच उल्हासनगर पालिकेत बस चालकांना एक महिन्याचे प्रशिक्षण दिल्यानंतरच बसचे स्टेरिंग हाती दिले जात असल्याचा दावा केणी यांनी केला आहे.



### नागरी संरक्षण दलाचा जनजागृती सप्ताह



**कल्याण :** नागरी संरक्षण दल ६२ वा वर्धापन दिननिमित्त सर्वत्र जनजागृती सप्ताह सुरू आहे. या विषयान्वये उपनियंत्रक, नागरी संरक्षण, नवी मुंबई समूह ठाणे विजय जाधव यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाने मातोश्री वेलबाई देवजी हरिया कॉलेज, मोहने रोड, शहाड पश्चिम येथे जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमात आणीबाणी उचल पद्धत, बनावटी स्ट्रेचर, प्रथोमोपचार यांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच नागरी संरक्षण दलाचे कार्य व महत्व, देशसेवा याबद्दल सहभागी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात मातोश्री विद्यालयाचे मुख्यद्यापक गिरीश लटके व शिक्षिका कुमुदिनी सहभागी होते. तसेच नागरी संरक्षण दलाचे शकुंतला राय (कल्याण पश्चिम) आणि रामबरण यादव (टिटवाळा विभाग) हे मानसेवी अधिकारी उपस्थित होते. स्वयंसेवक लिना ढोणे, राजश्री सरोदे, रंजना मुखेडकर, कमल कडलग, स्वाती गिमोणकर, रुपाली कोंडार, योगेश बुडूक, नितीन कापसे, सुहास पवार, कौशल गोळे, निरंत धनके, प्रथमेश ढोणे स्वयंसेवक उपस्थित होते.

### जयंत पाटील यांना "आगरी साहित्य पुरस्कार"



**कल्याण :** आगरी युथ फोरम, डोंबिवली आयोजित २० वा अखिल भारतीय आगरी महोत्सवात सापाड गांव कल्याणचे कवी जयंत पाटील यांना "चिंकोरा" साठी राज्यस्तरीय "आगरी साहित्य पुरस्कार" २०२४ या वर्षासाठी मोठ्या उत्साहात प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार डॉ. श्रीपाद जोशी (मा. अध्यक्षः अ.भा. मराठी साहित्य महामंडळ) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सोबत डॉ. लक्ष्मीकांत देशमुख (मा. अध्यक्ष ९१वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन), प्रा. मिलिंद जोशी (कार्याध्यक्षः महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे), सुरेश देशपांडे (कार्याध्यक्षः म. सा. प. पुणे डोंबिवली शाखा) आगरी युथ फोरमचे गुलाब वझे, विश्वनाथ रसाळ, रामकृष्ण पाटील, कवी. संदेश भोईर, कवी. नितुराज पाटील, दिपेश भोईर, राजेंद्र पाटील उपस्थित होते.

# शहापूर - मुरबाड तालुका टँकरमुक्त करण्यासाठी 'शिवजल सुराज्य अभियान'

## पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुरबाड व शहापूर तालुक्यातील पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत टँकरग्रस्त भागात "शिवजल सुराज्य अभियान" १० डिसेंबर पासून राबविण्यात येत आहे. "शिवजल सुराज्य अभियान" यशस्वीपणे अमंलबजावणी व संनियत्रणासाठी जिल्हास्तरावर समिती निश्चित करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे समिती अध्यक्ष तथा मुख्य मार्गदर्शक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार समिती सहअध्यक्ष म्हणून कामकाज पाहणार आहेत.

कच्चे बंधारे/ वनराई बंधारे, साखळी सिमेंट बंधारे(नाला गाळ काढणे), के.टी.वेअर/ साठवण बंधारा दुरुस्ती/ नवीन कामे, पाझर तलाव/ गावतलाव दुरुस्ती/ गाळकाढणे/ नवीन कामे, खोल सलग समतळचर/ सलग समातरचर, पिण्यांच्या पाण्याची विहिर गाळ काढणे / दुरुस्ती, जलकुभ गाळ काढणे / नवीन बुडक्या, विंधण विहिरीव्दारे छतावरील पाऊसपाणी संकलन, रिचार्ज शाफट, गॅबीयन बंधारे आदी सर्व उपाययोजना 'शिवजल सुराज्य अभियान' अंतर्गत राबवण्यात येणार आहेत.



### समस्येवर उपाययोजना

शहापूर तालुक्यातील ४३ गाव, १५५ पाडे असे एकूण १९८ गाव/पाड्यात जुन २०२४ अखेर ४२ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता, तर मुरबाड तालुक्यातील १७ गाव, १८ पाडे असे एकूण ३५ गाव/पाड्यात जुन २०२४ अखेर ६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. असे एकूण २३३ गाव/पाडे टँकरग्रस्त होते तर ८२ हजार १०३ बाधित लोकसंख्या होती. ही समस्या लक्षात घेऊन शहापूर व मुरबाड या तालुक्यात टँकर मार्फत पाणीपुरवठा करण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी व लोक सहभागातून पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.

या सर्व कामांना नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी श्रमदान, पाण्याचे सुयोग्य नियोजन करून गावातील पाणी पातळी वाढवण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

तसेच १० डिसेंबर २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत अभियान कालावधी असून गाव-पाडयांमध्ये गटविकास अधिकारी यांनी संबधित बीट अभियंता लघुपाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा विभाग, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांना ग्रामपंचायत निहाय वेळापत्रकानुसार शिवार फेरी करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. गाव-पाड्यातील पाण्याची पातळी, साठवण क्षमता, स्त्रोत, पावसाच्या पाण्याचे प्रमाण, पावसाचे पाणी साठवण सक्षमता व गावातील पाणी वापर यासंदर्भांतील सविस्तर माहिती २६ डिसेंबरपर्यंत जिल्हा परिषदेस सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिपत्रकाव्दारे दिले आहेत.

त्याचप्रमाणे जिल्हयात टँकरग्रस्त भागात वर्षभर ४० ते ४५ लिटर प्रत्येक व्यक्तीस पाणी पुरवठा सुरळीतपणे होण्यासाठी जिल्हा नियोजन, आदिवासी उप योजना, बिगर आदिवासी उप योजना, नावीन्य पुर्ण योजना, जलयुक्त शिवार, एमआरईजीएस तसेच जिल्हा परिषद सेस निधी इत्यादी विविध योजनाव्दारे मंजूर निधी तसेच ग्रामपंचायतस्तर पेसा, वितआयोग लोकसहभाग तसेच सीएसआर फंड इत्यादी मधुन स्त्रोत बळकटीकरण तसेच भूजल संवर्धनाच्या योजना लघुपाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा विभाग, कृषी विभाग, एमआरईजीएस, ग्रामपंचायत व सामाजिक वनीकरण करून अभियान राबविण्यात येणार आहे. अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी तालुकास्तरावरुन उत्कृष्ठ नियोजन, अमंलबजावणी व सहाय्य करणाऱ्या ग्रामपंचायतीस "भूजल समृद्ध ग्रामपंचायत" पुरस्कार तालुका व जिल्हास्तरावर निवड करून देण्यात येईल अशी माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली.

#### संसर्गाची साखळी खंडित करणे हे उद्दिष्ट

# कुष्ठरोग मुक्तीसाठी 'कुसुम' विशेष मोहीम

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

केंद्र शासनाने २०२७ पर्यंत कुष्ठरोग रुग्णांची संख्या शून्य करण्याचे धोरण आखले आहे. त्या आनुषंगाने आरोग्य विभागाच्या वतीने दि. १६ डिसेंबर ते २० डिसेंबर या कालावधीत ठाणे जिल्हा ग्रामीण व शहरी विभागामध्ये कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) ही मोहीम राबविण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यात एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२४ अखेर ६०१ कुष्ठ रुग्णांची नोंद कुष्ठरोग विभागाने केली आहे.

वेदना नसल्याने अनेकवेळा रुग्ण या आजाराकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे याकडे दुर्लक्ष न करता वेळेत निदान करावयाचे आव्हान कुष्ठरोग विभागाकडून करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यात आश्रमशाळा-४३, वसतिगृह - २८, बांधकामाच्या जागा- ५९३, विटभट्टी - ७३७, कारागृह - ३, अति जोखमीची ठिकाणे - १ हजार ९७६ येथील कामगार यांचे आशा व स्वयंसेवका मार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

त्वरित कुष्ठरोगाचे निदान करून नजदिकच्या शासकीय संस्थेत, आरोग्य केंद्रात त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात येणार आहेत. या मोहिमेचे मूळ उद्दिष्ट वंचित विभागातील कुष्ठ रुग्णांना शोधून संसर्गाची साखळी खंडित करणे आहे. कुसुम मोहीम प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. गीता काकडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी जिल्ह्यातील सर्व यंत्रणेला निर्देशित केले आहे. तसेच आरोग्य कर्मचारी, आशा व स्वयंसेवक यांना प्रशिक्षण देण्यात आले माहिती घेऊन त्यानुसार सूक्ष्म कृती आराखडा बनवून त्याप्रमाणे कुष्ठरोग शोध मोहिमेचे नियोजन करण्यात आलेले आहे.



#### कुष्ठरोगामुळे येणारी विकृती

- **विकृती :** यामध्ये तळहाताला किंवा तळपायाला बधिरता येते. संवेदना नसल्याने गरम वस्तू पकडल्याने किंवा काही टोचल्याने तळहाताला किंवा तळपायाला जखमा पडू शकतात ज्या वर्षानुवर्षे जखम पूर्ण बरी होत नाही.
- **विकृती :** या प्रकारची विकृती डोळ्यांनी दिसण्यासारखी असते, जसे की हात-पायाची बोटे वाकडी होणे, मनगट लुळे पडणे, पाय लुळा पडणे, तळहाताला तळपायाला जखमा पडणे, डोळ्यांच्या पापण्या पूर्णतः बंद न करता येणे अशा प्रकारच्या विकृती ग्रेड टु च्या कुष्ठरोगमध्ये येते.
- याबाबत रुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे. जिल्हा समन्वय समितीच्या वतीने सर्व अतिजोखमीच्या भागात राहणाऱ्या समाज घटकातील कुष्ठरोगाची तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. गीता काकडे यांनी केले आहे.

#### कुष्ठरोगाची लक्षणे

- कुष्ठरोग जीवाणूमुळे होणारा सांसर्गिक आजार आहे.
- अंगावर असणारा फिक्कट, लालसर रंगाचा बधिर चट्टा व हाता पायामध्ये अशक्तपणा येणे ही कुष्ठ रोगाची प्रमुख लक्षणे आहेत.
- कानाच्या पळ्या जाड होणे व चेहरा लालसर, तेलकट व जाड होणे.
- त्वचेशी संलग्न मज्जा जाड व दुखऱ्या होणे.
- कुष्ठरोग सर्व वयोगटातील व्यक्तींना होऊ शकतो.

## प्लॅनेट जीएचपीमध्ये किल्ल्यांचे भव्य प्रदर्शन

◆ **कल्याण (वार्ताहर) :**

प्लॅनेट जीएचपीच्या गजानन हिरु पाटील विद्यामंदिर, मातोश्री शेवंताबाई गजानन पाटील माध्यमिक विद्यालय गजानन हिरु पाटील इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज यांच्या प्रांगणामध्ये ऐतिहासिक वारसा लाभलेल्या किल्ल्यांचे भव्य-दिव्य असे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्राची स्वतंत्रभूमी तयार होण्याआधी शौर्याचा एक मोठा इतिहास या किल्ल्यांनी पाहिलेला आहे. त्याकाळी संरक्षणासाठी महत्त्व असलेले किल्ले आज आपल्या इतिहासाची, आपल्या पूर्वजांच्या शौर्याची सोनेरी पाने म्हणून आपल्याला तितकेच महत्त्वाचे आहेत. हाच इतिहास आपल्या भावी पिढीला प्रेरणा व दुरुस्ती देण्याचे काम करत आहे. संस्कृतीचे कौतुक हवे, इतिहासाचे कौतुक हवे, गड-किल्ल्यांचे कौतुक हवे त्यासाठीच शाळेतील विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे किल्ल्यांचे प्रदर्शन मांडलेले आहे.



## विद्युत पोल सात रस्त्यांच्या कामात अडथळा

◆ **उल्हासनगर (वार्ताहर):**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए)च्या वतीने उल्हासनगर महानगर पालिका क्षेत्रात सात रस्त्यांच्या कामाला सुरुवात झाली आहे. परंतु रस्त्यांच्या कामात महावितरण कंपनीचे (एमएसईबी) चे ट्रासफार्मर आणि विजेचे खांब अडथळा निर्माण करीत असल्याने रस्त्याच्या कामात दिरंगाई होत असून यामुळे उल्हासनगरच्या नागरिकांना धूळ आणि वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. उल्हासनगर महापालिका क्षेत्रात एमएमआरडीए च्या वतीने सात प्रमुख रस्त्यांचे कामे सुरु करण्यात आली आहेत. या रस्त्यांचे काम करताना रस्त्याच्या आजूबाजूला महावितरण कंपनीचे शेकडो विद्युत पोल आणि ट्रान्सफार्मर असल्याने रस्त्याचा कामात अडथळा निर्माण होत आहे. याबाबत महापालिकेचे सहायक संचालक नगररचनाकार ललित खोब्रागडे यांनी या सात रस्त्यांची पाहाणी करुन रोड वाईडिंगची आखणी करताना या रस्त्याला बाधित असलेले विद्युत पोल आणि ट्रांसफार्मर अन्यत्र हटवण्या साठी पर्यायी जागा निश्चित करुन दिली होती महापालिकेचे विद्युत विभागाचे अभियंता हनुमंत खरात उप अभियंता मनोहर डिंडे यांनी या कामी एमएमआरडीएला सर्व माहिती आणि इतर मदत केली होती. ट्रांसफर्मर आणि विद्युत पोल हटवण्यासाठी लागणारा खर्च एमएमआरडीए च्या वतीने करण्याचे ठरले होते. एमएमआरडीएने या कामाचे कंत्राट महावितरण कंपनीला दिले असल्याचे समजते परंतु या सर्व घडामोडीला नऊ महिने होऊन गेले तरी देखील या सात रस्त्यामधून विद्युत पोल आणि ट्रांसफर्मर अद्याप हटवण्यात आले नसल्याने रस्त्याच्या कामात दिरंगाई होताना दिसत आहे. याबाबत अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी एमएमआरडीएला पत्र पाठवून महापालिकेने पर्यायी जागे बाबत सीमांकन निश्चिचत करून देण्यात आले आहे. तरी पर्यायी जागेवर ट्रांसफर्मर स्थलांतरीत करण्याची सूचना दिल्या असताना एमएमआरडीएकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.



पावणे येथील गामी ग्राऊंडवर सद्‌गुरू फाऊंडेशनच्या वतीने आयोजित साकेत महायज्ञात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रुद्राभिषेक

## विद्यापीठ उपकेंद्रात विद्यार्थिनींची सुरक्षा धोक्यात

◆ **ठाणे ( प्रतिनिधी) :**

मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्रात विधी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थिनींना बलात्काराच्या धमक्या तसेच अश्लील मजकूर असलेली पत्रे त्यांच्या वर्ग खोलीत व बॅगेत आढळल्याचा धक्कादायक प्रकार घडला. या संदर्भात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन चिंता व्यक्त केली. तसेच, कुलगुरूंची भेट घेतल्यानंतर या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आश्वासन कुलगुरूंनी दिल्याचे अभाविप प्रदेशमंत्री संकल्प फळदेसाई यांनी सांगितले. दरम्यान, कुणालाही पाठीशी घातलेले नाही, हा गंभीर प्रकार समोर येताच कापुरबावडी पोलीस ठाण्याच्या पोलीस डायरीत याची नोंद केल्याचे उपकेंद्र संचालक अद्वैत वैद्य यांनी स्पष्ट केले.

ठाणे शहरासह जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी बाळकुम परिसरात मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू केले आहे. ५ डिसेंबर रोजी या उपकेंद्रातील विधी विभागाच्या वर्ग खोलीत तसेच तीन विद्यार्थिनींच्या बॅगेत आक्षेपार्ह मजकुर असलेली पत्रे आढळली. याबाबत अभाविपने पत्रकार परिषद घेऊन आवाज उठवत उपकेंद्राच्या प्रमुखांवर आरोप केले. केंद्र प्रमुख लेखी तक्रार घ्यायला तयार नव्हते, विद्यार्थिनींचे पालक उपकेंद्राच्या प्रमुखांना जाऊन भेटल्यानंतर स्थानिक पोलीस ठाण्यात जबाब नोंदवताना विद्यार्थिनी सोबत कोणीही प्राध्यापक उपस्थित नसल्याचे अभाविपचे फळदेसाई यांनी सांगितले.

अखेर १२ डिसेंबर रोजी कुलगुरुची भेट घेत त्यांना हा सर्व प्रकार लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी यावर चौकशी समिती नेमण्याचे आश्वासन दिल्याचे फळदेसाई यांनी सांगितले.

## गैरकारभाराविरुद्ध सीपीआयचे आमरण उपोषण सुरू

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागात युवराज महाले यांना चुकीच्या पद्धतीने पदोन्नती देत मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यात आलेली असून बीडीओ यांनी दिलेला गोपनीय अहवाल देखील रद्द करण्यात आला होता. परंतु महापालिका आयुक्त यांनी यावर निर्णय देणे अपेक्षित असताना अद्याप महापालिका आयुक्त यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही. याच्या निषेधार्थ सीपीआयच्या वतीने रमेश गायकवाड हे कल्याण पाश्चिमेतील सुभाष मैदान येथे आमरण उपोषणाला बसले आहेत.



केडीएमसी शिक्षण विभागातील मुख्याध्यापक पदोन्नती २०२१ ची मूळ नस्ती गेली दोन वर्ष सादर न करणाऱ्या व संबंधित नस्ती गहाल करणाऱ्या अधिकारी विजय सरकटे व सा.प्र. वरिष्ठ लिपिक शशिकांत महाले यांच्यावर फौजदारी गुन्हाची नोंद करून त्यांना ताबडतोब बडतर्फ करावे. तसेच याची चौकशी करून गुन्हा नोंद करण्यात यावे व संबंधित कर्मचाऱ्यास बडतर्फ करण्यात यावे. या मागण्या उपोषणकर्त्यांनी केल्या आहेत.

#### आराखड्याची आयआयटी-मुंबईमार्फत फेरआखणी

# वाहतुकीच्या पुढील पाच वर्षांतील आव्हानांचा होणार अभ्यास

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे महापालिकेतर्फे २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या सर्वसमावेश वाहतूक आराखड्याची आताच्या बदललेल्या स्थितीनुसार फेरआखणी करण्यात येणार आहे. आयआयटी, मुंबईच्या 'जीआयएसई हब'च्या मदतीने फेरआखणीचे काम करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात, आयआयटी, मुंबईतील जीआयएसई हबचे प्रा. सुमीत सेन यांच्यासोबत यासंदर्भात नुकतीच एक बैठक झाली. या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, उपायुक्त शंकर पाटोळे, उपनगर अभियंता विकास ढोले, सुधीर गायकवाड, कार्यकारी अभियंता धनाजी मोदे आणि भगवान शिंदे उपस्थित होते.



- **मूळ आराखडा सन २०१८चा**

मेट्रो रेल्वेच्या नियोजनाचा भाग म्हणून ठाणे महापालिकेतर्फे संपूर्ण महापालिका क्षेत्राचा सर्वसमावेशक वाहतूक आराखडा तयार करण्यात आला होता. २०१० पासून या आराखड्याचे काम सुरू करण्यात आले. २०१८ मध्ये त्यास अंतिम स्वरूप देण्यात आले. त्यात, मेट्रो मार्गांचे आरेखन, ठाणे पूर्व येथील सॅटीस प्रकल्प, ठाणे-मुलुंड दरम्यानचे नवीन उपनगरीय रेल्वे स्थानक, आनंद नगर ते साकेत कोस्टल रोड, भुयारी मार्ग आदींबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. ठाणे शहराची वाढ लक्षात घेऊन लोकसंख्येच्या घनतेप्रमाणे वाहतूक व्यवस्थापन करण्यात आले होते.

- **वर्षभरात होणार फेरआखणी**

या आराखड्यातील तरतूदी आणि सद्यस्थिती तसेच भविष्यातील आव्हाने यांचा अभ्यास करून आराखड्याची फेरमांडणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. २०१८ मधील या आराखड्याची फेरमांडणी करून २०३० पर्यंतच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी, आयआयटी, मुंबईतील 'जीआयएसई हब' या विज्ञान आणि अभियांत्रिकी यांची सांगड घालणाऱ्या तज्ज्ञ गटांच्या मदतीने पुढील वर्षभरात फेरआखणीचे काम करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त सौरभ राव यांनी दिली.

- **फेरआखणीचा उद्देश**

शहरातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सर्वसमावेशक वाहतूक आराखड्याचा अभ्यास करणे, त्यात सुचवण्यात आलेल्या उपायांच्या अमलबजावणीचा आढावा घेणे आणि बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक ते उपाय व सूचना करणे हा या फेरआखणीचा मुख्य उद्देश आहे. आयआयटी, मुंबईतील 'जीआयएसई हब'मधील तज्ज्ञ आणि अभ्यासक हे उपलब्ध माहिती, नव्याने प्राप्त झालेल्या अत्याधुनिक मॉडेल्सच्या मदतीने ही फेरमांडणी करणार असल्याचे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

तसेच ही फेरमांडणी करताना, त्यात वाहतुकीचे बदलेले पॅटर्न, शालेय बसेस तसेच इतर गाड्यांची वाढलेली वाहतूक, घनकचऱ्याची वाहतूक, बांधकामातील राडारोड्याची वाहतूक यामुळे वाहतुकीवर येणारा ताण याचा अभ्यास केला जाणार आहे. तसेच, सायकल ट्रॅक, केवळ पादचारी वाहतुकीसाठीची व्यवस्था यांचाही विचार केला जाणार आहे.

ठाणे शहरालगत असलेल्या खाडीचा जल वाहतुकीसाठी कसा उपयोग करता येईल याबद्दल त्यात अभ्यास करण्याची सूचना आयुक्त राव यांनी केली आहे. मेट्रो, रेल्वेपर्यंत ये-जा करण्यासाठी वाहतूक व्यवस्थेची रचना, पार्किंग व्यवस्था, तीन हात नाका येथील वाहतूक कोंडीबाबत सूचना यांचाही या फेरमांडणीत अभ्यासही करण्यात येणार आहे.

### 'तलाव परिसरासाठी सुरक्षा रक्षक नेमणूक करावी'



**ठाणे :** ठाणे पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेऊन, माझ्या प्रभागातील तुर्केपाडा तलाव परिसरासाठी २४ तास सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. तुर्केपाडा तलाव परिसरात अर्बन फॉरेस्ट उपक्रमाअंतर्गत हजारो झाडांची लागवड करण्यात आली आहे, ज्यामुळे सध्या तेथे एक सुंदर आणि विकसित वनराई तयार झाली आहे. मात्र, सुरक्षा रक्षक नसल्यामुळे परिसरातील जंगलाची आणि इतर सुविधांची समाजकंटकांकडून नासधूस होत आहे. येथे गर्दुले, दारू पिणारे आणि गैरप्रकार करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढत आहे. मागील आठवड्यात काही समाजकंटकांकडून जंगलात आग लावल्यामुळे मोठ्या प्रमाणावर झाडांचे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर, भविष्यात कोणतीही मोठी दुर्घटना होऊ नये यासाठी तात्काळ त्या ठिकाणी २४ तास सुरक्षा रक्षक नियुक्त करावेत.

## 'भाजपा परिवाराचे सदस्यत्व म्हणजे देशसेवेची सुवर्णसंधी'

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

'सेवा ही संघटन' या तत्त्वावर वाटचाल करणाऱ्या भारतीय जनता पक्ष परिवाराचे सदस्यत्व म्हणजे देशासेवा करण्याची सुवर्णसंधी असल्याचे मत भाजपाचे माजी आमदार आणि सदस्य नोंदणी मोहिमेचे प्रदेश सहसंयोजक नरेंद्र पवार यांनी व्यक्त केले. राज्य पातळीवरील सदस्य नोंदणी मोहिमेअंतर्गत शहापूर, मुरबाड आणि बदलापूरमध्ये नरेंद्र पवार, आमदार किसन कथोरे यांच्यासह स्थानिक नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठका संपन्न झाल्या. त्यामध्ये पवार यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधताना हे मत व्यक्त केले. आजच्या घडीला भारतीय जनता पक्ष हा सर्वाधिक सदस्य असलेला भारतातील नव्हे तर जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून उदयास आला आहे. केंद्र सरकारकडून सुरू असलेली गतिमान विकासकामे आणि भविष्याचा वेध घेत दूरगामी परिणाम करणाऱ्या ध्येय धोरणांची आखणीच नव्हे तर अंमलबजावणीही सुरू आहे. या सर्व गोष्टींनी प्रेरित होऊन आज देशभरात अनेकजण भारतीय जनता पक्षाचे सदस्य होण्यासाठी स्वतःहून पुढे येत आहेत.

# अठराव्या वर्षातील विश्वविजेता...

भारताचा डोम्माराजू गुकेश नवा बुद्धिबळ जगज्जेता ठरला. सिंगापूर येथे गुरुवारी फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत १४व्या आणि अंतिम डावात गतविजेता चीनच्या डिंग लिरेनला चेकमेट देत त्याने जेतेपदाला गवसणी घातली. त्यानंतर संपूर्ण भारतात अनोख्या जल्लोषाला सुरुवात झाली. स्पर्धेच्या १३८ वर्षांच्या इतिहासात १८ वर्षीय गुकेश हा जगातील सर्वात तरुण विजेता ठरला. याबाबत त्याने माजी विजेते, महान खेळाडू रशियाचे गॅरी कास्पारोव्ह यांना मागे टाकले. आपले महान खेळाडू आणि माजी विश्वविजेता विश्वनाथन आनंद यांच्यानंतर वर्ल्ड चॅम्पियन बनलेला गुकेश हा भारताचा केवळ दुसरा बुद्धिबळपटू आहे. गुकेश हा पाच वेळा विश्वविजेता आनंद यांचा शिष्य आहे. आनंद यांच्या वेस्टब्रिज आनंद बुद्धिबळ अॅकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेतो. आनंद यांनी २०००मध्ये पहिल्यांदा भारतात जगज्जेतेपदाची ट्रॉफी आणली. त्यानंतर २००७ ते २०१३ या कालावधीत चार असे एकूण विक्रमी वेळा जगज्जेतेपदावर नाव कोरले. त्यानंतर तब्बल १३ वर्षांनी त्यांच्या शिष्याने ही अनोखी कामगिरी साकारली. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या इतिहासात विश्वविजेती ठरलेली आनंद-गुकेश ही जगभरातील पहिलीच जोडी आहे.

कुठल्याही खेळात जगज्जेतेपद मिळवणे सोपे नसते. फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धाही त्याला अपवाद नाही. यंदा सिंगापूरमध्ये १७ दिवस रंगलेल्या जागतिक स्पर्धेत डिंग आणि गुकेश यांच्यात चुरशीची लढत झाली. गतविजेता लिरेन जेतेपद राखण्यासाठी उत्सुक होता. या वर्षाच्या सुरुवातीला झालेली चॅलेंजर्स स्पर्धा जिंकून गुकेशने प्रबळ दावेदारी पेश केली. यंदाच्या स्पर्धेत १४ पैकी चार डाव निकाली ठरले, तर दहा डाव बरोबरीत (ड्रॉ) झाले. डिंग लिरेनने पहिला डाव ४२व्या चालीमध्ये जिंकताना आश्वासक सुरुवात केली. दुसऱ्या डावात पिछाडीवरून गुकेशने स्वतःला सावरले. हा डाव बरोबरीत सुटला. त्यानंतर गुकेशने तिसऱ्या डावात ३७व्या चालीमध्ये विजय मिळवून जबरदस्त पुनरागमन केले. तोडीसतोड खेळाचे प्रदर्शन झाल्याने चौथा ते दहा असे सलग सात डाव बरोबरीत सुटले. ११व्या डावात पांढऱ्या मोहऱ्यांनिशी खेळताना गुकेशने प्रतिस्पर्ध्याला कोंडीत पकडत २९व्या चालीमध्ये मात दिली. मात्र, पुढच्याच डावात डिंगने पलटवार करताना विजय मिळवला. १३व्या डावात दोघांनीही सावध पवित्रा घेतला. तेव्हा लिरेन आणि गुकेशच्या खात्यात प्रत्येकी ६.५ गुण होते. त्यामुळे १४व्या आणि अंतिम डावाकडे अवघ्या जगाचे लक्ष लागून राहिले होते. निर्णायक डावात गुकेशने काळ्या सोंगट्यांसह खेळूनही बाजी मारली. हा डाव बरोबरीकडे झुकणार असे वाटत होते; परंतु ५५व्या चालीत लिरेनने मोठी चूक केली. ज्याचा फायदा उठवत गुकेशने ७.५-६-५ अशा फरकाने पहिल्या-वहिल्या जगज्जेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

गुकेशच्या जागतिक यशात स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षक पॅडी अपटन यांचा मोठा वाटा आहे. अपटन यांच्याच मार्गदर्शनाखाली भारताच्या क्रिकेट संघाने २०११ वनडे विश्वचषक आणि २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये हॉकीमध्ये कांस्यपदकाची कमाई केली होती. गुकेशसारख्या युवा खेळाडूला मदत करत पॅडी अपटन यांनी पुन्हा एकदा आपले वेगळेपण सिद्ध केले. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत खेळणे प्रत्येक बुद्धिबळपटूसाठी खडतर मानले जाते. अनेकदा हा सामना फक्त तुम्ही शिकलेल्या चालींचा नाही, तर मानसिकतेचाही होतो. मॅग्नस कार्लसनसारखा विख्यात बुद्धिबळपटूही आपली पहिली जागतिक अजिंक्यपद स्पर्धा खेळत असताना थोडासा विचलीत झाला होता. डिंग लिरेनला आव्हान देत असताना विजेतेपदासाठीच्या लढतीत गुकेशला सुरुवातीलाच दोन धक्के बसले. पहिल्याच सामन्यात झालेला पराभव आणि त्यानंतरच्या सामन्यात विजय शक्य असतानाही झालेला पराभव गुकेशसाठी धक्कादायक होता; परंतु यानंतर गुकेशने जो खेळ केला तो निव्वळ अविश्वसनीय होता. तुम्हाला एखाद्या परीक्षेत चांगली कामगिरी करायची असेल तर संपूर्ण पुस्तकाचा तुम्हाला चांगल्या पद्धतीने अभ्यास करावा लागतो. तेव्हाच तुम्ही परीक्षेत आत्मविश्वासाने जाऊ शकता. केवळ आशेच्या जोरावर तुम्ही परीक्षा देऊ शकत नाही. स्पर्धेदरम्यान किती वेळ झोपायचे, पिछाडीवर किंवा दबावाखाली स्वतःला कसं सावरायचे तसेच प्रत्येक क्षणांचा कसा सामना करायचा याचा अभ्यास करून गुकेश अंतिम सामन्यात उतरला होता. त्यामुळे पहिल्याच प्रयत्नात त्याने जगज्जेतेपदावर नाव कोरले, हे अपटन यांनी गुकेशच्या मेहनतीबद्दल केलेले भाष्य खूप काही सांगून जाते. प्रत्येक खेळाडूने त्याप्रमाणे स्वतःला घडवायला हवे. मूळचा चेन्नईचा असलेल्या गुकेशचे आई-वडील उच्चशिक्षित आहेत. त्याची आई मायक्रोबायोलॉजिस्ट आणि वडील डॉक्टर आहेत. मात्र, गुकेशला त्याच्या आई-वडिलांच्या क्षेत्रापेक्षा बुद्धिबळमध्ये अधिक रूची होती. सातव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात करणाऱ्या गुकेशने केवळ ११ वर्षांच्या कालावधीत वर्ल्ड चॅम्पियन बनून भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. अत्यल्प काळात मिळवलेले यश त्याची मेहनत, एकाग्रता आणि बुद्धिमत्ता दर्शवते. जेतेपद पटकावल्यानंतर गुकेश भावुक झाला. त्याला आनंदाश्रू अनावर झाले. स्पर्धा संपल्यानंतर पत्रकार परिषदेत पुन्हा बुद्धिबळाचा पट जसा मांडतो तसा मांडला आणि त्याला नमस्कार केला. ही आपली संस्कृती आहे. परंपरा आहे. ती त्याने परदेशातही जपली. गुकेश हा जगज्जेतेपदामुळे युवा पिढीसाठी एक प्रेरणास्त्रोत बनला आहे. आपल्याकडे अठरावं वरीस धोक्याचे मानले जाते. कारण मुले सज्ञान होतात. या वयात बिघडण्याचा धोका अधिक असतो. मात्र, अठरावे वर्ष हे विश्वविक्रमाचे असते, हे डोम्माराजू गुकेशने दाखवून दिले.

# मारकडवाडीतील विरोध अन्...

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर २०२४ रोजी लागला. हा निकाल खऱ्या अर्थाने वेगळा होता. लोकसभा निवडणुकीच्या निकालात महाराष्ट्राच्या जनतेने घेतलेला निर्णय आणि २०२४ विधानसभा निवडणुकीतील निर्णय वेगळा होता. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील नद्यांमधून भरपूर पाणी वाहून गेले होते. अनेक मोठ मोठे निर्णय झाले होते, बहुसंख्य समाजाला जागृत करण्याची एक मोठी मोहीम जून महिन्यापासून कार्यरत होती. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या बाजूने निकाल लागला आहे; परंतु २३ नोव्हेंबरच्या दुपारनंतर महाविकास आघाडीने आपल्या दारुण पराभवावर विश्लेषण करण्याऐवजी, आपण कुठे कमी पडलो हे पाहण्याऐवजी आपला पराभव ईव्हीएममुळे झाला असा बोभाटा करून आपली कातडी बचाव करण्याचा प्रयत्न केला. तो प्रयत्न आजही करत आहेत. त्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार उत्तमराव जानकर यांनी मारकडवाडी या गावात प्रति निवडणूक आयोग स्थापन करून मतपत्रिकेवर निवडणूक घेण्याची घोषणा केली.

खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानात तरतूद असलेल्या भारतीय निवडणूक आयोगावर त्या प्रकियेला आव्हान देणे ही संविधान विरोधी घटना आहे आणि त्याचे समर्थन राहुल गांधी, शरद पवार यांसारखे नेते करत आहेत. ही बाब गंभीर आहे. काही दिवसांपूर्वी शरद पवार यांनी मारकडवाडी दौरा केला. आता राहुल गांधीही मारकडवाडीला येत आहेत. काही वर्षांपूर्वी पिपली लाईव्ह चित्रपट आला होता. त्या चित्रपटात ज्या पद्धतीने राजकीय नेते, प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी पिपली गावात पर्यटनासाठी जात होते. त्याप्रमाणे आताही अनेक नेते, लोकशाही प्रक्रियेवर निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासाठी मारकडवाडीत जात आहेत आणि मीडिया मारकडवाडी लाईव्ह करत आहेत. यातून हे नेते मंडळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आणि भारतीय लोकशाही प्रक्रियेवर आक्षेप निर्माण करत आहेत. महाविकास आघाडी, इंडी गठबंधन खऱ्या अर्थाने लोकशाही विरोधी, शहरी नक्षल समर्थक लोकांच्या हातातील बाहुले बनले आहेत.

**निवडणूक प्रक्रिया कोण व कशी राबवतात**

भारतातील निवडणूक प्रक्रिया ही भारत निवडणूक आयोगाच्या माध्यमातून निःपक्षपाती प्रमाणे होते. भारतीय संविधानाच्या लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१च्या कलम १९अ, २०, २०अ प्रमाणे निवडणूक प्रक्रिया



२०२४च्या विधानसभा निवडणुकांनंतर लागलेल्या निणर्यावर नाराज असलेल्या मारकडवाडीत ईव्हीएमविरोधात आवाज उठवला गेला. प्रति निवडणूक आयोग स्थापन करून मतपत्रिकेवर निवडणूक घेण्याची घोषणा केली. आपला पराभव ईव्हीएममुळे झाला असा समज अनेक पराभूत दिग्गज नेत्यांनी केला. तो अजूनही करत आहेत. मात्र आपले अपयश लपवण्यासाठी ईव्हीएम मशीन, शासकीय अधिकारी, कर्मचारी, भारत निवडणूक आयोगाला बदनाम कशासाठी? हा एकच प्रश्न ईव्हीएम विरोधात असलेल्या मारकडवाडीला विचारावासा वाटतो.

राबवण्याचा अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहे. ही सर्व निवडणूक प्रक्रिया भारत लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भारतीय प्रशासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वात आपापल्या जिल्ह्यातील सर्व शासकीय कर्मचारी, अधिकारी यांच्यामार्फत राबवली जाते. यामध्ये सर्व पोलीस प्रशासन या निवडणूक प्रक्रिया निःपक्षपाती राबविण्यासाठी, कोठेही कायदा सुव्यवस्था खराब होऊ नये यासाठी मदत करतात. मग आता प्रश्न पडतो की, महाविकास आघाडीवाले नेतेमंडळी, शहरी नक्षल समर्थक मंडळी हे निवडणूक प्रक्रियेत २ महिन्यांपासून काम करणारे गडचिरोलीच्या

**गोविंद प्रकाशराव देशपांडे**
**माध्यम संयोजक, अभाविप**

दुर्गम भागापासून मुंबईतील गगनचुंबी इमारतीत मतदान प्रक्रिया व्यवस्थित, सुरळीत पार पडण्यासाठी काम करणारे शासकीय कर्मचाऱ्यांवर, प्राध्यापकांवर, शिक्षकांवर, पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांवर आणि त्यांच्या प्रमाणिकतेवर संशय निर्माण करून देशात अराजकता माजवण्यासाठी हे प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत का? सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षकांवर त्यांच्या प्रामाणिक निवडणूक कर्तव्यावर महाविकास आघाडी आणि राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे आणि त्यांचे समर्थक अराजकतावादी तत्त्व प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. हे प्रश्नचिन्ह केवळ निवडणूक प्रक्रियेवर, भारत निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नाहीत, तर या महाराष्ट्रातील हजारो शासकीय कर्मचारी, शिक्षक प्राध्यापकांनी प्रामाणिकपणे निभावलेल्या निवडणूक कर्तव्यावर हे प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहेत आणि महाराष्ट्रातील जनता हा सर्व प्रकार खुल्या डोळ्यांनी बघत आहे.

**ईव्हीएम मशीनबद्दल...**

निवडणूक प्रक्रिया राबवण्याच्या दोन महिने आगोदरपासून निवडणूक आयोगाचे काम सुरू होते. शासकीय गोदामामधील ईव्हीएम मशीनचे first Level cheking (FLC) हे सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर केले जाते. त्यात सर्व मशीनची तपासणी केली जाते. प्रत्येक मतदारसंघात वापरण्यात येणाऱ्या मशीनच्या १ टक्के मशीनवर १२०० मतदान करून ते मतदान हे योग्य होते आहे का? हे सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर तपासले जाते. २ टक्के मशीनमध्ये १००० मतदान करून तपासले जाते. अजून १ टक्के मशीनमध्ये ५०० मतदान करून तपासले जाते. तसेच उर्वरित सर्व मशीनमध्ये १६ उमेदवार असतात त्या प्रत्येक उमेदवाराला ६ मतदान करून ते मतदान योग्य आहे का हे तपासले जाते आणि त्यावर त्या सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची स्वाक्षरी असते.

एवढी प्रक्रिया राबवली जात असताना शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांवर अविश्वास का दाखवला जातोय? २०१७ पासून भारत निवडणूक आयोगाने ईव्हीएम मशीनमध्ये जर काही आक्षेप असतील तर देशातील कोणत्याही व्यक्तीने, राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार करावी, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले असतानाही निवडणूक आयोगाकडे तक्रार न करता मारकडवाडी लाईव्ह कशासाठी असा प्रश्न उपस्थित होतो. आपले अपयश लपवण्यासाठी ईव्हीएम मशीन, शासकीय अधिकारी, कर्मचारी, भारत निवडणूक आयोग, बदनाम कशासाठी? काही दिवसांपूर्वी एका पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी एक शेर सांगितला होता, "अधुरी हसरतों का इल्जाम हर बार हम पर ही लगाना ठीक नहीं, वफा खुद से नही होती, और खता ईवीएम की कहते हो" तूर्तास एवढंच!

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात गवारेड्यांची दहशत

कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्हा हा निसर्गसौंदर्याने नटलेला असून १९९९ साली आपल्या भारत देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे. अशा या जिल्ह्यात गवारेड्या अगोदर हत्तींनी धुमाकूळ घातला होता. आता तर गवारेड्यांची दहशत गावागावात वाढत आहे. त्यामुळे एकटा दुकटा शेतकरी सुद्धा कामानिमित्ताने जंगलात जाण्यासाठी घाबरत आहे. तेव्हा वन विभागाने गवारेड्यांना आळा घालणे आवश्यक आहे. मागील दहा वर्षांचा विचार करता आकडेवारी उपलब्ध नसली तरी दिवसेंदिवस सिंधुदुर्ग जिल्ह्यात गवारेड्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. आता तर रस्त्यावरील वाहनांना सुद्धा धडक देऊ लागले आहेत. ही घटना मागील पंधरा दिवसांतील, देवगड तालुक्यामधील शिरगांव राकसघाटी येथील आहे. इळये गावचे नागरिक अभिषेक मिराशी हे कामानिमित्त इनोव्हा गाडीने नांदगावच्या दिशेने जात असताना अचानक गाडीला धडक दिल्याने कारच्या दर्शनी भागाचे नुकसान झाले. तसेच याच परिसरात बाबल्या पवार आपल्या दुचाकीवरून जात असताना त्याच्या दुचाकीला धडक देऊन त्याला पण गंभीर जखमी केले होते. तसेच आठ महिन्यांपूर्वी प्रकाश गोगटे यांच्या पण गाडीला धडक दिली होती. त्यात बरेच गाडीचे नुकसान गोगटे यांचे झाले होते. इतकेच काय मागील महिन्यात सुद्धा एका दुचाकीवाल्याला जखमी केल्याची घटना आहे. तसेच चार वर्षांपूर्वी भिरवंडे खलांतरवरची वाडीतील शेतकरी विलास सावंत यांच्या लावणीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले होते. त्यामुळे आता वन विभागाने गाफील राहून चालणार नाही. त्यावर कायमचा तोडगा काढणे गरजेचे आहे.

अशा घटनांमुळे स्थानिक नागरिक भीतीच्या वातावरणात वावरत आहेत. तेव्हा ही बाब जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांच्या दृष्टीने अतिशय गंभीर असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या गवारेड्यांच्या वावरामुळे कुडाळ, कणकवली व वैभववाडी तालुक्यातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणात भात शेतीचे नुकसान झाले आहे. मी, कणकवली शहरातील एस. एम. हायस्कूलमध्ये इयत्ता ९वीमध्ये (१९८५-८६) असताना स्काऊट गाईडचा कॅम्प दाजीपूर येथे २५ व २६ डिसेंबर, १९८५ रोजी गेला होता. त्यावेळी कांबळी सरांच्या मार्गदर्शनाखाली दाजीपूरच्या अभयारण्यात गवारेडे पाहण्यासाठी गेलो होतो. मात्र एकाही गवारेड्याचे दर्शन झाले नाही. आता मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गावोगावी गवारेडे पोहोचले आहेत. त्यामुळे रानावनात जाणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका आहे. गवारेडे गावात येण्याची अनेक कारणे असतील. कोण सांगतात पाण्यासाठी गावात येतात. जंगलतोड झाल्याने व गावातील सड्यावरील शेती नागरिक करीत नसल्यामुळे जंगली जनावरे लोकवस्तीकडे येऊ लागली आहेत. असे असले तरी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे आहे. मागील काही प्रसंग घडल्याने गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशावेळी वन विभागाने पुढे येणे गरजेचे आहे.



वनविभाग हा आपल्या महाराष्ट्र राज्याचा एक विभाग असून त्या विभागाजवळ वनीकरण आणि वन्यजीव व्यवस्थापनाची मोठी जबाबदारी असते. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गवारेड्यांच्या दहशतीचा विचार करता वनविभागाने गवारेड्यांचा बंदोबस्त करावा. जेणेकरून गवारेड्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे ते दूर करण्यासाठी मदत होईल. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गवारेड्यांची दहशत कायमची थांबवण्यासाठी आता लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा, अशी स्थानिक जनतेची मागणी आहे.



**रवींद्र तांबे**

अशा घटनांमुळे जास्त तणाव शेतात मोलमजुरी करणाऱ्या कामगारांमध्ये तसेच गावच्या पोलीस पाटील यांच्यावर येतो. यासाठी वनविभागाने पंचनामे करत बसण्यापेक्षा आता नागरिकांच्या जीवाची काळजी घेणे आवश्यक आहे. तेव्हा असे असले तरी नागरिकांनी आपली आपणच काळजी घेण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, त्यासाठी खालील बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल.

गवारेडा हा झाडांची पाने, गवत, झाडांचे कोंब आणि विविध प्रकारची फळे खातात. तसेच ते कळपाने राहतात, तेव्हा जिल्ह्यातील ज्या गावात त्यांचा वावर असेल त्या ठिकाणच्या नागरिकांनी वनविभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. त्यासाठी स्थानिक नागरिकांनी सतर्क राहून सावधगिरी बाळगावी. नागरिकांनी गवारेडा कुठे असेल, कोणत्या डोंगरात असेल याच्या शोधात जाऊ नये. जरी वावरत आता कमी झाला असे समजून एकटे शेतमळ्यात जाऊ नये. ज्याठिकाणी गवारेड्यांचा कळप दिसेल त्या परिसरात फटाके वाजवू नयेत. तसेच आरडाओरडा करू नये. शक्यतो संध्याकाळनंतर घराच्या बाहेर पडू नये. जायचे झाल्यास मोठा प्रकाश असणारी बॅटरी सोबत घ्यावी. आपल्या परिसरात गवारेडे आढळले, तर तत्काळ वन विभागाला कळविण्यात यावे. ज्या मार्गाने गवारेडे जात असतील त्यांच्या मार्गात अडथळा निर्माण करू नये.

जर शेतीचे गवारेड्याकडून नुकसान झाल्यास त्याची नुकसानभरपाई वनविभागाकडून मिळू शकते याची शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी. त्यासाठी वनविभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल. आपल्या विभागातील वनविभागाने कार्यालयातील दिलेला फोन, अधिकाऱ्यांचा मोबाईल नंबर तसेच १९२६ या त्यांच्या फोनवर तत्काळ अचूक माहिती द्यावी. म्हणजे त्यांना कारवाई करणे सोपे जाईल. यातून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांच्या मनातील भीती दूर होऊन जिल्ह्यामधील गवारेड्यांची दहशत कमी होईल.

## राशिभविष्य

शनिवार,१४ डिसेंबर २०२४

**|| पंचांग ||**

आज मिती मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशी शके १९४६. चंद्र नक्षत्र रोहिणी. योग सिद्ध ८.२६ पर्यंत नंतर साध्य,चंद्र राशी ऋषभ,भारतीय सौर २३ मार्गशीर्ष शके १९४६ . शनिवार, दिनांक १४ डिसेंबर २०२४. मुंबईचा सूर्योदय ७.०३, मुंबईचा सूर्यास्त ६.०३, मुंबईचा चंद्रोदय ४.५९ मुंबईचा चंद्रास्त ६.५३ उद्याची, राहू काळ ९.४८ ते ११.१०. श्री.दत्तात्रय जयंती, गाणगापुर, १७ पर्यन्त चांगला,राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन.

**|| भविष्य ||**

**मेष** : प्रत्येक कामात यश मिळेल.

**वृषभ** : अपेक्षेप्रमाणे घडेल. इच्छापूर्तीचा दिवस आहे.

**मिथुन** : आर्थिक लाभ होऊ शकतात.

**कर्क** : नवीन लोकांच्या ओळखी होतील.

**सिंह** : नोकरीत- व्यवसायात चांगली परिस्थिती राहील.

**कन्या** : आपल्या कामगिरीची दखल घेतली जाईल.

**तूळ** : मनात काळजीचे विचार राहू शकतात.

**वृश्चिक** : जोडीदार आपल्याला सांभाळून घेईल.

**धनू** : शांतपणे निर्णय घेणे आवश्यक ठरेल.

**मकर** : वाद विकोपाला जाऊ शकतात, संयम बाळगणे.

**कुंभ** : अनावश्यक खर्च टाळावेत.

**मीन** : मनावर ताबा ठेवा.





### नियतीचा फेरा की योगायोग?

पुढच्या काळात काम करत असताना तुम्ही विरोधी पक्षाला गोड वागणूक द्या, असे म्हणत रोहित पाटील यांनी पहिल्याच भाषणात सीएम यांच्यावर निशाणा साधला आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे रोहित पाटील हे तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघातून निवडून आले आहेत. देशातील सर्वात तरुण आमदार म्हणून रोहित पाटील यांच्याकडे पाहिले जाते. वयाची २५ वर्षे पूर्ण होताच पाटील यांनी विधानसभेत 'एन्ट्री' केली असून पक्षाने विधिमंडळ गटनेतेपदीही निवड केली आहे. हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी एक अनोखाच प्रसंग घडल्याचं पाहायला मिळालं. राजकारणातही नियतीचा फेरा पुन्हा फिरून तिथंच आल्याची एक घटना घडलीय. दशकभरापूर्वीची गोष्ट. ८ डिसेंबर २०१४ म्हणजे आजपासून १० वर्षांपूर्वी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनास सुरुवात होणार होती. तासगाव मतदारसंघातून आमदार बनलेले आर. आर. पाटील यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे याच दिवशी विधानसभेच्या रणांगणातून माघारी फिरावं लागलं. त्याच दिवशी दहा वर्षांनी जुनियर आर. आर. पाटील म्हणजेच आमदार रोहित पवार यांनी विधानसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली आहे. त्यामुळे आता याला केवळ योगायोग म्हणायचा की नियतीचा खेळ! अशी चर्चा रंगली आहे.

– **राजू जाधव,** मांगूर जि.बेळगांव

### 'केवायसी'च्या नावाखाली...

केवायसी (तुमचा ग्राहक जाणून घ्या) अपडेट (अद्ययावत) करण्यासाठी लोकांना अनेक वेळा बँकांमध्ये जावे लागते. केवायसी कागदपत्रे बँकेत जमा न केल्यास, ग्राहकांना खाती वापरण्यापासून रोखले जाते किंवा खाते निलंबित केले जाते. बंद खाती कार्यान्वित करण्यासाठी केवायसी पुन्हा अपडेट करावे लागते. मुद्दा असा आहे की, खाते उघडताना बँका आधीच ग्राहकांकडून आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादी कागदपत्रे मागतात, मग ग्राहकाला वारंवार फोन करून केवायसीसाठी त्रास का दिला जातो? या प्रक्रियेत तासनतास रांगेत उभे राहावे लागते. कर्मचाऱ्यांची कमतरता असते. तथापि, केवायसी अपडेट न केल्यास ग्राहकांचे व्यवहार ठप्प होतात.

– **प्रा. व्ही. कोष्टी,** शिपूर जि. सांगली

### आता अंतिम पाडाव

निवडणुकीचे एक एक टप्पे पार पडले आता अंतिम पाडाव म्हणजेच मंत्रिमंडळ स्थापन करणे. विधानसभा निवडणुकीतील यशानंतर बहुसंख्य आमदारांना मंत्रीपदाचे वेध लागले असले, तरी पक्षाच्या वाट्याला अधिक मंत्रीपदे कशी येतील यासाठी पक्षाच्या प्रमुखांची सहयोगी पक्षांच्या मुख्य नेत्यांबरोबर खलबते झाली. आपल्या पक्षातील नाराजांना शमविण्याचे कठीण काम सोपे कसे करता येईल आणि इच्छुक आमदारांचा नाराजीचा सूर दूर करण्यासाठी व त्यांना थोपवून धरण्यासाठी काय करता येईल याचा विचार करून अडीच-अडीच वर्षांची फिरती मंत्रीपदे देण्याचा तोडगा राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेच्या एका गटाचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांनी काढल्याचे समजले. क्रिकेट खेळातील धर्तीवर त्यांनी अवलंबलेली रोटेटिंग सिस्टीम राजकारणाच्या खेळात चालेल का? हा प्रश्न आहे. आमदारांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या अट्टहासामुळे, माजी मंत्री पुन्हा आस लावून बसल्याने आणि इच्छुक आमदार आशेवर असल्याने तसेच त्यांची संख्या आणि पदरी पडलेल्या मंत्रीपदांची संख्या याचे समीकरण जुळून यावर तोडगा काढण्यासाठी ही पद्धत वापरून ही कोंडी फुटेल असे अजिबात वाटत नाही. त्यात नाराजांना पक्ष बदलण्याचे पर्याय इथे उपलब्ध आहेत. असंतुष्ट याच पर्यायाचा सर्रास वापर करतील आणि राजकीय भूकंपावर भूकंप होत राहतील याचीच भीती वाटते!

– **चंद्रशेखर दाभोळकर,** भांडुप

### आता सगळे बदलले...

फारच थोडे पोलीस अधिकारी पैसे घेत नाहीत, असे निवृत्त पोलीस महासंचालक मीरा बोरवणकर भालेराव स्मृती पुरस्कार स्वीकारताना संभाजीनगर येथे म्हणाल्या. त्यांनी सध्याच्या अंमलदारीचे वास्तव डोळ्यांपुढे ठेवले आहे. साठ वर्षांपूर्वी मुंबई पोलिसांची तुलना स्कॉटलंड यार्ड या पोलिसांबरोबर केली जात असे. आता सगळे बदलले. भ्रष्ट अंमलदारांना लाच घेतल्याशिवाय करमत नाही. लाच काही वेळा दोन्ही पक्षांकडून घेतली जाते. यामुळे शहरा-शहरांमध्ये गुन्हेगारी बोकाळली आहे. अनेक पोलीस अधिकाऱ्यांना लाच घेताना राज्यात विविध ठिकाणी लाचलुचपत विभाग दरवर्षी पकडत असते. नंतर चौकशी बारगळते. पोलिसांच्या सुट्ट्या मंजूर करण्यासाठी सुद्धा पैसे घेतले जातात, असे वृत्तपत्रात लिहून आले होते (कालिना), विमान नगर पोर्श अपघातामुळे पुणे शहरात फोफावलेले रात्रीचे बार उजेडात आले. हे सर्व हप्ते आणि वरिष्ठांच्या आशीर्वादामुळे घते. आमदारांच्या निवडणुकीप्रमाणे पोलिसांच्या निवडीसाठी, सद् रक्षणाय खल निग्रहणाय जनतेकडून मतदान घेण्यात यावे.

– **गिरीश भागवत,** यशवंतनगर

### 'एक देश, एक निवडणूक'

एकाचवेळी लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका झाल्यास पैसा वाचेल असा दावा सत्तारूढ केंद्र सरकारने केला. या निवडणुका एकाचवेळी झाल्यास विकासकामांना सुद्धा गती मिळेल. आज जगातील जपान, जर्मनी इंडोनेशिया, फिलिपाइन्समध्ये एकाचवेळी निवडणुका होतात. लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका एकत्र घेण्याच्या विधेयकाला देशातील निम्म्यापेक्षा जास्त राज्यांनी मान्यता देणे जरुरीचे आहे. विरोधी पक्षांनी या विधेयकावर टीका केली आहे. सरकारला लोकसभेत हे विधेयक दोन तृतीयांश बहुमताने मंजूर करण्यास खूप प्रयत्न करावे लागतील. अनेक विरोधी पक्षांचे सहकार्य घ्यावे लागेल. यात सरकारची कसोटी पणाला लागेल असे दिसते. एकूणच केंद्र सरकारचे धोरण चांगले आहे. पण त्याला विरोधी पक्षांची साथ सुद्धा हवी आहे.

– **शांताराम वाघ,** पुणे

### बुद्धिबळ पटावरील नवा राजा

सिंगापूर येथे पार पडलेल्या जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत अवघ्या १८ वर्षांतही जग जिंकता येते हे चेन्नईच्या डी. गुकेशने दाखवून दिले. जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत गुकेशच्या देदीप्यमान कामगिरीमुळे भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. अवघ्या १८व्या वर्षी गुकेश जगज्जेता बनून बुद्धिबळ खेळातील बाजीगर ठरला. भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश याने शेवटच्या आणि १४व्या डावात चीनचा जगज्जेता डिंग लिरेनाला धूळ चारत बुद्धिबळाच्या पटावरील नवा राजा होण्याचा मान मिळविला. रशियाच्या गॅरी कास्पारोह यांचा १४ वर्षांपासूनचा विक्रम मोडीत काढला. विश्वनाथन आनंद यांच्यानंतर जगज्जेता होण्याचा मान पटकावणारा गुकेश हा भारताचा दुसरा बुद्धिबळपटू ठरला. या अविस्मरणीय क्षणांमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नाव उंचावले आहे. प्रत्येक बुद्धिबळपटूला हा क्षण जगायचा असतो.

– **आर.जाधव,** बेळगाव

### डी. गुकेश नवा बुद्धिबळ जगज्जेता


२५ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर २०२४ या कालावधीत सिंगापूरमध्ये खेळविल्या गेलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या अवघ्या १८ वर्षीय डोम्माराजू गुकेशने चीनच्या गतविजेत्या डिंग लिरेनचा पराभव करून विश्वविजेतेपद मिळवले आणि भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून आला. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा जिंकणारा तो १८वा बुद्धिबळ जगज्जेता बनला, तर विश्वनाथन आनंद नंतरचा तो केवळ दुसरा भारतीय आणि जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला. यापूर्वी रशियाचा गॅरी कास्पारॉव (१९९३) आणि नार्वेचा मॅग्नस कार्लसन (२०१३) हे दोघे वयाच्या २२व्या वर्षी जगज्जेते बनले होते. १३ डावांनंतर त्याची आणि डिंग लिरेनची ६.५-६.५ अशी बरोबरी झाली होती. मात्र १४व्या डावात गुकेशने सर्व कौशल्य पणाला लावत मानसिक स्थैर्य न ढळू देता थरारक विजय मिळवला आणि जगज्जेते पदावर आपले नाव कोरले. जागतिक पातळीवर बुद्धिबळ खेळात रशियाचे (पूर्वीचे सोव्हिएत युनियन) वर्चस्व राहिले असून गेल्या १३८ वर्षांच्या इतिहासात वेगवेगळ्या फॉरमॅटद्वारे खेळविण्यात आलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत विश्वविजेतेपद पटकविणाऱ्या १८ पैकी ९ विश्वविजेते हे रशियाचे आहेत. त्यानंतर दोन जागतिक अजिंक्यपदे मिळवून भारत दुसऱ्या स्थानी आला आहे. .

– **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

## हॅप्पी बर्थ डे



सदानंद दाते (आयपीएस)



श्याम बेनेगल (दिग्दर्शक)



राजन भोसले
सरचिटणीस, ईशान्य. मुंबई



राणा दग्गुबती (अभिनेता/दिग्दर्शक)



प्रदीप शिंदे (सामाजिक कार्यकर्ता)

किशोर गांगुर्डे (जनसंपर्क)

अश्विन मुद्गल (आएएस)

राजन पारकर (पत्रकार)

# महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार : मुख्यमंत्री

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी विविध विकासांच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याला देशातील ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याने अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केलेले आहे. आता २०२८ ते २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करू असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटर, बिकेसी, वांद्रे येथे १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ झाला असून यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी माजी मंत्री तथा आमदार मंगल प्रभात लोढा, वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक स्वामी विद्यानंद, अध्यक्ष राजेश शर्मा, प्रमुख वक्ते पद्मश्री टी. व्ही. मोहनदास पै, सहसचिव शैलेश त्रिवेदी यासह जगातील विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मात्र भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आणि विविध क्षेत्रातील विकासाच्या तत्वावर आधारित वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. पाश्चिमात्य संस्कृती आणि आपल्या संस्कृतीमध्ये मूलभूत अंतर आहे. पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये जो कोणी सक्षम आहे तोच विकास करू शकतो; मात्र आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक जन्मलेला व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आणि अधिकार आहे. भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने सर्व जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारा भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे. जगातील लोक म्हणत होते की एवढे मोठी लोकसंख्या असलेला देश कशाप्रकारे प्रगती करू शकतो.

## वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचा शुभारंभ



### वाहतुकीमध्ये लक्षणीय बदल

यामध्ये लॉजिस्टिक धोरण, सर्वाधिक गतिमान रस्त्यांचे जाळे बनवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग ७०० किलोमीटर असून जो १६ जिल्ह्यांना जोडला असून, हा महामार्ग थेट जेएनपीटी या बंदराला जोडला आहे. यातून अत्यंत चांगल्या पुरवठा दारांची साखळी निर्माण होत आहे. रस्ते, विमान वाहतूक, बंदर विकास या पायाभूत सुविधा सक्षम करण्यावरती राज्य शासन भर देत आहे.

# आ. नितेश राणे यांच्या मागणीवरून सीएसटी ते करमळी स्पेशल रेल्वे गाडीला वैभववाडीत थांबा

◆ कणकवली (प्रतिनिधी) :

०११५१/०११५२ सीएसटी ते गोवा करमळी अशा धावणाऱ्या हिवाळी विशेष रेल्वे गाडीला आमदार नितेश राणे यांच्या मागणीची दखल घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी रोड आणि सावंतवाडी रोड येथे थांबे देण्यात आले आहेत. आमदार नितेश राणे यांनी रेल्वे मंत्रालय आणि रेल्वे प्रशासनाकडे याबाबतचा पत्रव्यवहार करून तातडीने हे थांबे मंजूर केले जावेत अशी विनंती केली होती. या विनंतीला मान देऊन प्रशासनाने वैभववाडी स्थानकावर ही गाडी जाता-येता थांबवण्याचे आदेश जारी केले आहेत. रेल्वेच्या या निर्णयामुळे आमदार नितेश राणे यांनी रेल्वेमंत्री तसेच रेल्वे प्रशासन यांचे आभार व्यक्त केले आहेत.

याबाबत कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार मुंबई ते गोव्यातील करमळी दरम्यान दररोज चालवण्यात येणाऱ्या विशेष गाडीला सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैभववाडी आणि सावंतवाडी स्थानकांवर अतिरिक्त थांबे मंजूर केले आहेत, असे जाहीर केले आहेत. हिवाळी पर्यटन हंगाम तसेच ख्रिसमसमुळे कोकण रेल्वे मार्गावर होणारी गर्दी लक्षात घेऊन विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय रेल्वेकडून घेण्यात आला आहे. या संदर्भात कोकण रेल्वेकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार विशेष गाड्या पुढीलप्रमाणे असतील :

गाडी क्रमांक ०११५१ मुंबई सीएसएमटी-करमळी विशेष (दररोज) मुंबई सीएसएमटी येथून ००.२० वाजता दररोज २०/१२/२०२४ ते ०५/०१/२०२५दरम्यान सुटेल आणि करमळी येथे त्याच दिवशी १३.३० वाजता ती पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५२ करमळी-मुंबई सीएसएमटी विशेष (दररोज) करमळी येथून १४.१५ वाजता दररोज २०/१२/२०२४ ते ०५/०१/२०२५ दरम्यान सुटेल व मुंबई सीएसएमटी येथे दुसऱ्या दिवशी ०३.४५ वाजता ती पोहोचेल.




**थांबे :** दादर, ठाणे, पनवेल, पेन, रोहा, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर, वैभववाडी, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी, थिवीम.

**डब्यांची रचना :** एकूण २२ डबे - प्रथम वातानुकूलित - १ डबा, मिश्रित (प्रथम वातानुकूलित + द्वितीय वातानुकूलित)-१ डबा, द्वितीय वातानुकूलित-३ डबे, तृतीय वातानुकूलित-११ डबे, स्लीपर-२ डबे, सामान्य -२ डबे, एसएलआर-२ डबे. या गाडीला सावंतवाडी आणि वैभववाडी या दोन महत्त्वाच्या तालुक्यात थांबा मिळाला असल्यामुळे प्रवाशांमधून समाधान व्यक्त केले जात आहे, तसेच आमदार नितेश राणे यांनी हे थांबे मिळावेत म्हणून केलेल्या प्रयत्नाबद्दल जनतेतून आभारही व्यक्त केले जात आहेत.

## वेचक





### प्रभादेवी येथील ८४ वर्षे जुने दत्त मंदिर

**मुंबई :** प्रभादेवी येथील या दत्त मंदिराची स्थापना १९४० साली झाली. ही दत्ताची सुबक आणि मनमोहक संगरवरी मूर्ती आहे. येथील दत्त मंदिराचे भूमिपूजन स्व.मधूसुदन दा.रावते यांच्या हस्ते झाले. हेच मंदिराचे पहिले विश्वस्त होते. त्यानंतर त्यांचे पूत्र कमलाकर भ. रावते हे होते. आज या मंदिराचे तीन विश्वस्त आहेत ते म्हणजे अतिष अ. मंत्री, प्रताप मंत्री व अजित क. रावते. अजित रावते हे मधूसुदन रावते यांचे नातू अध्यक्ष म्हणून काम पाहतात. या मंदिरात इतरही देवांचे छोटी मंदिरे आहेत. जसे गणपती, मारुती, शीतला देवी, शंकर पार्वती, तसेच बाहेरील बाजूस एक मोठे उंबराचे झाड, वडाचे व पिंपळाचे झाड आहे व तेथेच एक मोठे मार्बलचे तुळशी वृंदावन आहे. आजूबाजूला इतके बदल होत असतानाही या मंदिराने आपला साधेपणा आजही जपून ठेवला आहे. दत्तजयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली आहे. सकाळी ६.३० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते.

### दत्तजयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**भांडुप :** श्री दत्तजयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला आहे. हा सप्ताह ९ डिसेंबर पासून ते १६ डिसेंबर पर्यंत श्री स्वामी समर्थ बालसंस्कार केंद्र कोकण नगर भांडुप प. येथे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर या सप्ताहात गुरुचरित्र पारायण देखील ठेवण्यात केले जाणार आहे. तर १४ व १५ डिसेंबर रोजी मल्कारी याग, नित्य स्वाहाकार पूर्णाआहुती वा दत्त जन्मोत्सव करण्याचे योजिले आहे. तसेच १६ डिसेंबर रोजी श्रीसत्य दत्त पूजन , देवता सिर्जन व सांगता समारोचा कार्यक्रम होणार असून रात्री १०.३० वाजता महानेवैद्य आरती करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा.



### पटोलेंचे थेट खर्गेंना पत्र

**सर्व जबाबदारीतून मुक्त करा!**

**मुंबई :** काँग्रेसकडून येत्या एक दोन दिवसांत बैठक घेण्यात येणार असल्याचे व त्यामध्ये मोठे फेरबदल होण्याचे संकेत असताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना पत्र लिहून सर्व जबाबदारीतून मुक्त करा, अशी मागणी केली आहे. त्यामध्ये गेल्या चार वर्षांपासून काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी संभाळली आहे. त्यामध्ये राज्यातील लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठे यश मिळवून दिले मात्र नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. त्यामुळे मला या सर्व जबाबदारीतून मुक्त करा, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करून नवीन प्रदेशाध्यक्ष नेमण्याची भूमिकाही त्यांनी या पत्रातून मांडली असल्याचे समजते. काँग्रेसचा विधिमंडळ नेता निवडीसाठी १७ डिसेंबरला बैठक होण्याची शक्यता आहे.

# दादर स्थानकातील हनुमान मंदिराला रेल्वेकडून नोटीस



छाया : अरूण पाटील

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

दादर स्टेशन येथील ८० वर्षांचे हनुमान मंदिर पाडण्याची नोटीस केंद्र सरकारच्या अखत्यारीतील रेल्वे विभागाने दिली आहे. दादर रेल्वे स्थानकातील हमालांनी या मंदिराची स्थापना केली आहे. दादर स्थानकातील हमाल आणि हिंदू कॉलनी परिसरातील लाखो भाविकांचे हे मंदिर श्रद्धास्थान आहे. या मंदिराला काढून घेण्याची नोटीस मंदिर विश्वस्त समितीला बजावण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १२ जवळ आरपीएफ ऑफिसजवळ हे हनुमान मंदिर आहे. आठ दशकांपूर्वी स्थानकातील हमालांनी या मंदिराची स्थापना केली. याच ठिकाणी साई बाबांचेही छोटे मंदिर आहे. आठ दशकांपासून असलेले हे मंदिर बेकायदा असल्याचे सांगत ते पाडण्यासाठी मध्य रेल्वेच्या कार्यकारी सहायक मंडल इंजिनियर यांनी नोटीस बजावली आहे. सात दिवसात हे बेकायदा बांधकाम पाडावे अन्यथा रेल्वे विभागाकडून बांधकाम हटवण्यात येईल.



उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्या पत्नी खा. सुनेत्रा पवार आणि मुलगा पार्थ पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

## राज्यसभेचे कामकाज १६ डिसेंबरपर्यंत तहकूब

**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनात १६ व १७ डिसेंबरला राज्यसभेत भारतीय संविधानावर चर्चा होणार आहे. तत्पूर्वी शुक्रवारी काँग्रेसने राज्यसभा सभापतीं विरोधात अविश्वास ठराव मांडला. यावरून संसदेच्या हिवाळी अधिवेशना दरम्यानच शुक्रवारी राज्यसभेत प्रचंड गदारोळ झाला. त्यानंतर १६ डिसेंबरपर्यंत राज्यसभा सभागृह तहकूब करण्यात आले आहे.

राज्यसभा सभापती सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालवत नाहीत. विरोधी पक्षांना पुरेसा वेळ दिला जात नाही, असा आरोप विरोधी पक्षाने अविश्वास ठराव मांडताना केला आहे. यावर सभापतींनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. विरोधकांच्या अविश्वास ठरावावर सभापती जगदीप धनखड म्हणाले की, मी शेतकऱ्याचा मुलगा आहे, मरेन पण झुकणार नाही. तुम्ही लोकांनी संविधानाचे तुकडे केलेत. मी खूप सहन केले. तुम्हाला प्रस्ताव आणण्याचा अधिकार आहे; पण तुम्ही संविधानाचा अपमान करत आहात, अशा शब्दांमध्ये सभापतींनी त्यांचे मत व्यक्त केले.

काँग्रेसचे राज्यसभा खासदार आणि राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पुन्हा एकदा राज्यसभा सभापतींवर पक्षपाताचा आरोप केला. ते म्हणाले, तुम्ही भाजपा खासदारांना बोलण्याची संधी देत आहात, तर काँग्रेसला नाही. आम्ही तुमची स्तुती ऐकायला इथे आलो नाही, तर जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आलो आहोत.

# अल्लू अर्जुनला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

साऊथ सुपरस्टार अल्लू अर्जुनला एका सर्वसामान्य आरोपीप्रमाणे अटक करण्यात आली असून त्याची सरकारी रुग्णालयात मेडिकल टेस्ट करण्यात आली. त्यावेळी रुग्णालयाच्या आवारात त्याच्या चाहत्यांनी एकच गर्दी केल्याचे दिसून आले. दरम्यान, अल्लू अर्जुनला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. त्यामुळे त्याच्या जामिनाचा मार्ग मोकळा झाला आहे.

हैदराबादच्या संध्या थिएटरमध्ये पुष्पा २ चित्रपटाचा प्रीमिअर शो आयोजित करण्यात आला होता.



त्यावेळी अल्लू अर्जुनने पोलीस प्रशासनाना माहिती न देता उपस्थिती लावली होती.

अल्लू अर्जुनला पाहण्यासाठी चाहत्यांची गर्दी झाली. या गर्दीचे व्यवस्थापन त्या चित्रपट व्यवस्थापकांना करता आले नाही. परिणामी त्या ठिकाणी चेंगराचेंगरी झाली. त्यामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला. ४ डिसेंबर २०२४ रोजी घडलेल्या या घटनेनंतर त्या महिलेच्या कुटुंबीयांनी अल्लू अर्जुन व संध्या थिएटर मालकाविरोधात गुन्हा नोंद केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पुष्पा फेम अल्लू अर्जुनला पोलिसांनी त्याच्या घरी जाऊन अटक केली. त्यानंतर त्याला हैदराबादच्या गांधी रुग्णालयात मेडिकल टेस्टसाठी हजर करण्यात आले. अल्लू अर्जुनची सिकंदराबादच्या गांधी रुग्णालयात बीपी, शुगर व कोविड टेस्ट पार पडली. त्याच्या टेस्ट नॉर्मल आल्या आहेत. त्याची ईसीजी टेस्टही करण्यात आली. सुरक्षेच्या कारणाने सुपरिंटेंडंटच्या दालनात तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत या तपासण्या करण्यात आल्या आहेत.

# अश्विनी भिडे सांभाळणार मुख्यमंत्री कार्यालयाचा पदभार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक असणाऱ्या अश्विनी भिडे यांची बदली झाली आहे. अश्विनी भिडे यांची आता मुख्यमंत्री कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे. अश्विनी भिडे यांची आता मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अश्विनी भिडे यांना त्वरित या पदाचा कारभार हाती घेण्याचे आदेश देण्यात आले असून पुढील आदेशापर्यंत मेट्रोच्या व्यवस्थापकीय पदाचा कार्यभार सांभाळण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. यापूर्वी मुख्यमंत्री कार्यालयाचा पदभार हे ब्रिजेश सिंह हे पाहत होते. त्यांच्या जागी आता अश्विनी भिडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीनंतर फडणवीसांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार सत्तेत आल्यावर काही अधिकाऱ्यांच्या बदल्या होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

## रविवारी पश्चिम रेल्वेवर बोरिवली-गोरेगाव स्थानकांदरम्यान 'जम्बो ब्लॉक'

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

पश्चिम रेल्वे मार्गावर सिग्नलिंग आणि ओव्हरहेड उपकरणांच्या देखभालीसाठी रविवारी १५ डिसेंबरला बोरिवली आणि गोरेगाव स्थानकांदरम्यान १०.०० ते १५.०० वाजेपर्यंत अप आणि डाऊन धीम्या मार्गांवर पाच तासांचा जंबो ब्लॉक घेण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, ब्लॉक कालावधीत अप आणि डाऊन मार्गावरील सर्व धिम्या गाड्या गोरेगाव ते बोरिवली दरम्यान जलद मार्गावर चालवल्या जातील. ब्लॉकमुळे काही अप आणि डाऊन उपनगरीय सेवा रद्द राहतील आणि काही अंधेरी आणि बोरिवली लोकल गोरेगाव स्थानकापर्यंत धावतील.



ब्लॉक कालावधीत बोरिवली स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्र. १, २, ३ आणि ४ या कोणत्याही प्लॅटफॉर्मवर ट्रेनचे आगमन/निर्गमन होणार नाही. या ब्लॉकची सविस्तर माहिती संबंधित स्टेशन मास्टर्सकडे उपलब्ध आहे. प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी प्रवास सुरू करताना वरील व्यवस्था लक्षात ठेवा.




५,५०० कोटी रुपयांच्या १६७ विकास प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी प्रयागराजमध्ये करण्यात आले. यावेळी राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे देखील उपस्थित होते.

## सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार, काष्ठशिल्पकार प्रा. मनोहर सप्रे यांचे निधन

◆ चंद्रपूर (प्रतिनिधी) :



सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार आणि काष्ठशिल्पकार प्रा.मनोहर सप्रे यांचे शुक्रवारी १३ डिसेंबरला वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या सरकारनगर येथील आपल्या राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर शनिवारी चंद्रपूरमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. उत्तम लेखक, वक्ते आणि वने-वन्यजीव चळवळीतील कार्यकर्ते म्हणून मनोहर सप्रे यांची ओळख होती. चंद्रपूरच्या जनता महाविद्यालयात त्यांनी २२ वर्षे राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर पूर्णवेळ व्यंगचित्र रेखाटन आणि पत्रकारिता केली. त्यांची वृत्तपत्रांसाठी काढलेली व्यंगचित्रे खूप गाजली. प्रबोधनकार ठाकरे, बाळासाहेब ठाकरे, आर के लक्ष्मण यांच्यासारख्या अनेक दिग्गजांसोबत देखील त्यांनी काम केले आहे. व्यंगचित्रांबरोबरीने काष्ठशिल्पांचा छंदही त्यांनी जोपासला. केवळ भारतातच नव्हे, तर फ्रान्समध्ये सिर्केना व अमेरिकेत फिलाडेल्फिया येथे काष्ठशिल्पांची प्रदर्शने त्यांनी भरवली. सांजी, मनोहारी, दहिवर, हसा की, व्यंग विनोद, व्यंगार्थी, रुद्राक्षी, अलस-कलस आदी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

## मोदीजींवर बोलायची तुमची लायकी नाही

**नवनीत राणांचा घणाघात**

**मुंबई :** बांगलादेशमधील हिंदूंवरील अत्याचारावरून उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पत्रकार परिषद घेत जोरदार हल्लाबोल केला. बांगलादेशमध्ये इस्कॉनच्या प्रमुखाला अटक झाली, तिथे हिंदूंवर अन्याय होताय. विश्वगुरू शांत का आहेत? असे त्यांनी म्हटले होते. यावरून भाजपा नेत्या नवनीत राणा यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला. आज ते देशाच्या पंतप्रधानांवर बोलत आहेत. जनाब उद्धव ठाकरे तुमची लायकी नाही, देशाच्या पंतप्रधानांवर बोलायची, असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.

**जालना जिल्हा अव्वल; बसविले सर्वाधिक १५,९४० पंप**

# मागेल त्याला सौर कृषी पंप, गाठला एक लाखांचा टप्पा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर वीजनिर्मिती पॅनेल्स व कृषी पंप असा संपूर्ण संच शेतकऱ्यांना देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने एक लाख पंप बसविण्याचा टप्पा ओलांडला आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्र राज्याने देशात आघाडी घेतली असून त्याबद्दल नुकताच केंद्र सरकारने आयोजित केलेल्या बैठकीत राज्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. राज्यात दि. ११ डिसेंबरपर्यंत एकूण १,०१,४६२ सौर कृषी पंप महावितरणकडून बसविण्यात आले आहेत. यामध्ये सर्वाधिक १५,९४० पंप जालना जिल्ह्यात बसविण्यात आले आहेत. बीड (१४,७०५ पंप), परभणी (९,३३४), अहिल्यानगर (७६३०), छत्रपती संभाजीनगर (६२६७) आणि हिंगोली (६०१४) जिल्ह्यांमध्ये जालन्याच्या खालोखाल पंप बसविण्यात आले आहेत.

राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्य सरकारने राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. दहा लाखापेक्षा जास्त पंप बसविण्यात येणार असल्याने कृषी पंपासाठी पैसे भरून वीज कनेक्शनची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सुटणार आहे. या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषी पंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. महावितरणने आतापर्यंत योजनांच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून २ लाख सौर कृषी पंप बसविले आहेत.



सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीज पुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

# घरत गणपती चित्रपटासाठी नवज्योत बांदिवडेकर यांना सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शकाचा पुरस्कार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या ५५ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात घरत गणपती चित्रपटाचे दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर यांना सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शकाचा पुरस्काराने गौरव करण्यात आला. गोव्यामध्ये ५५वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव नुकताच पार पडला. जागतिक स्तरावर नावाजलेल्या या महोत्सवात देश-विदेशातील अनेक दर्जेदार चित्रपट दाखवण्यात आले. महोत्सवाला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.



या महोत्सवात 'घरत गणपती' चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. यावेळी मराठी आणि अमराठी लोकांनी चित्रपट पाहिला आणि कौतुक केले. चित्रपट क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी सुद्धा चित्रपटाबाबत चांगल्या प्रतिक्रिया दिल्या. नवज्योत नरेंद्र बांदिवडेकर या तरुण दिग्दर्शकाचा पहिलावहिला दिग्दर्शक म्हणून 'घरत गणपती' हा चित्रपट जुलै महिन्यात प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात भूषण प्रधान, निकिता दत्ता, अजिंक्य देव, अश्विनी भावे, संजय मोने, शुभांगी लाटकर, शुभांगी गोखले, डॉ. शरद भुताडिया, सुषमा देशपांडे आणि परी तेलंग आदी कलाकारांनी काम केले होते. पॅनोरमा स्टुडिओजने या चित्रपटाचे वितरण केले होते. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती. महाराष्ट्राचा लोकोत्सव असणाऱ्या गणपती सणात एकत्र येणाऱ्या कुटुंबाची कथा या चित्रपटात मांडण्यात आली होती.

# दंड पावतीची खाडाखोड महागात

कारवाई

## कारवाई:पाच जणांवर लोणार पोलिसांत गुन्हा




लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

अवैद्य रेती वाहतूक प्रकरणातील शासकीय चलनात खाडाखोड केल्याचे निर्दशनास आल्या प्रकरणी निवासी नायब तहसीलदार रामप्रसाद डोळे यांच्या तक्रारीवरुन लोणार पोलिसांत ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील तळणी परिसरात साठवणूक केलेल्या रेतीची लोणार मार्गे अवैध वाहतूक केल्याचे मागील दिवसांमध्ये उघडकीस आले होते. याप्रकरणी अवैद्य रेती वाहतुकीवर महसूल प्रशासनाने कारवाई करत दंड आकारून दंडाची रक्कम वसूल केली. एप्रिल ते ३० नोव्हेंबर याकालावधीत अवैद्यरीत्या रेती वाहतूक कारवाई प्रकरणाची तपासणी करण्यात आली. यामध्ये, अवैद्य रेती वाहतूक प्रकरणात आकारलेल्या दंडाची रक्कम भरलेल्या शासकीय चलनात खोडाखाड झल्याचे निर्दशनास आले. निवासी नायब तहसिलदार रामप्रसाद डोळे यांनी ११ डिसेंबर रोजी लोणार पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली. त्यावरुन, विनोद डोईफोडे, गणेश हरिभाऊ चाटे, रामेश्वर वामन राठोड, अभिषेक जनार्धन कुंबफळे (सर्व रा. मंठा) व लोणार तालुक्यातील अरुण विष्णुपंत जायभाये यांच्या विरूध्द भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३३८, ३३६ (३), ३४० (२), ३ (५) नुसार विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक निमिष मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनात स.पो.उपनि. इंगळे हे करीत आहेत.

संबंधीत प्रकरणाचा तपास पोलिस करीत आहेत. तसेच वर्षभरात अवैद्य रेती वाहतूक कारवाई प्रकरण दंडाच्या भरणा झालेल्या चलनाची पडताळणी करणे सुरू आहे. यामध्ये गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील.

–भूषण पाटील, तहसिलदार, लोणार

### ..या मागे कोण?

सदर प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून स्वतंत्र समिती नेमून सखोल चौकशी करून लेखा परीक्षण केल्यास खूप मोठे रॅकेट उघडे पडू शकते. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून शासनाची फसवणूक करणारे यामागे कोण सूत्रधार आहे याचा सुद्धा तपास करणे तितकेच गरजेचे आहे.

# इस्त्रो अभ्यास सहलीसाठी निवड

## शैक्षणिक:ओजस अनिल कुलकर्णीचे यश









माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

नोबेल फांऊडेशन आणि भवरलाल जैन फांऊडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभरात नोबेल सायन्स टॅलेंट सर्च (छड्ढड) ही परीक्षा घेतली जाते, यात प्रथम पात्रता परीक्षा नंतर लेखी परीक्षा आणि त्यात निवड होणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांची मुलाखत परीक्षा घेतली जाते, या तिन्ही अडथळ्यांच्या परीक्षा पूर्ण केल्यानंतर इयत्ता निहाय विद्यार्थ्यांची निवड केली जाते,

या परीक्षेत यश मिळवून निवडलेल्या विद्यार्थ्यांना या फाऊंडेशन मार्फत प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देण्यात येतेच परंतु या बाल वैज्ञानिकांना इस्त्रो या भारतीय अवकाश पान २ वर...

# वाळुमाफीयांचे पाठीराखे कोण?

## दुर्लक्ष: चिंचोली माळी सर्कलमध्ये वाळुचोर



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी सर्कल मधील काही गावातील मोठ्या नदी परिसरामध्ये मध्ये वाळू माफियांचा धुमाकूळ सुरु आहे. उत्रेश्वर पींप्री व बोरगाव या परिसरामध्ये नदीपात्रात मध्ये रोज रात्रीच्या वेळी वाळू माफिया हजारो ब्रश वाळू उपसा करतात. नदीपात्रातून वाळू माफिया वाळूची ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळूची हजारो ब्रास वाळू उपसा चोरी करत आहे चिंचोली माळी सर्कल मधील अनेक मोठ्या नद्या आहेत अशा नदी मोठ्या नदीपात्रामध्ये एक ते दीड – खोलीचे खड्डे पडले आहे. त्यामुळे शेतकरी हवाल दिल झाला आहे. त्यामधून वाळू माफियाना हजारो ब्रास वाळूची चोरलेला दिसून येत आहे. दुसरीकडे वाळू माफिया यांचे अच्छे दिन आलेले दिसत आहे. त्यामुळे महसूल व पोलीस प्रशासन यांचे दुर्लक्ष दिसून येत आहे. उत्रेश्वर पींप्री व बोरगाव नदी पात्रामध्ये अवैध रीतीने ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळू उपसा कधी थांबणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे. तर दुसरीकडे वाळू माफिया रात्रीच्या वेळी धुमाकूळ सुरू आहे.यावर वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन अवैध रीतीने वाळू चालणाऱ्या ट्रॅक्टरवरून मालकावर कारवाई करण्याची मागणी पान २ वर...

# स्वाभिमानी धम्म परिषद

## नियोजन:भीमराव आंबेडकरांची उपस्थिती



राहुरी/पुण्यभुमी प्रतिनिधी

अहमदनगर जिल्ह्यातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या हरेगाव धम्मभूमी येथे १६ डिसेंबर रोजी १५वी स्वाभिमानी धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे या धम्म परिषदेला प्रमुख अतिथी म्हणून आदरणीय डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर हे प्रमुख उपस्थितीत राहणार आहेत

भन्तेजी बी संघपाल महाथेरो व्यवस्थापक चैत्यभुमी मुंबई व भन्तेजी सुबोध बोधिजी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे धम्म परिषदेसाठी राष्ट्रीय उपाध्यक्ष एस के भंडारे महाप्रभारी भिकाजी कांबळे राज्य अध्यक्ष यु जी बोराडे अशोक केदारे गौरव पवार के वाय सुरवाडे आदी संबोधित करणार आहेत

सकाळी १० वा ध्वजारोहण करून महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून समता सैनिक दलाची मानवंदना देण्यात येणार आहे त्यानंतर स्टेजवरील महापुरुषांच्या प्रतिमेला मानवंदना देऊन भन्तेजी पंचांग प्रणाम सह त्रिसरण पंचशील देतील कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक रामदास सोनवणे व सूत्रसंचालन पान २ वर...

# कोंबींग ऑपरेशन थांबवून गुन्हे मागे घ्या

## आ.संदीप क्षीरसागरांची पोलीस महासंचालकांकडे मागणी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान केल्याचा प्रकार घडला होता. याचा निषेध म्हणून आंबेडकरी समाजबांधवांनी परभणीमध्ये आंदोलन केले होते. त्यामुळे अनेक समाजबांधवांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि होत आहेत. तसेच कोंबींग ऑपरेशन करून नागरिकांना मारहाण केली जात आहे. दरम्यान भारतीय राज्यघटना म्हणजे आपल्या अस्मितेचा विषय असल्याने त्याबाबत कसलीही अवहेलना समाज खपवून घेऊ शकत नाही. या भावनेतून हे आंदोलन करण्यात आले होते. तरी पोलिस प्रशासनाने कोंबिंग ऑपरेशन थांबवून, आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घटनाकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आहे व पुतळ्याच्या जवळच भारतीय संविधानाची प्रतिकृती साकारलेली आहे. मंगळवारी (दि.१०) रोजी या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना एका माथेफिरूकडून करण्यात आली. शेवटी भारतीय संविधान हा सर्वांच्याच अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी समाजबांधवांनी आंदोलने केली. आंदोलनाला अल्प प्रमाणात हिंसक वळण आले. त्यामुळे पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन करून आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे सुरू आहे. परंतु या आंदोलनाचा हेतू हा मुळीच हिंसा पसरवणे नव्हता. समाजबांधवांनी लोकशाही मार्गानेच आंदोलन केले होते. परंतु अशा आंदोलनाच्या आडून काही प्रवृत्ती हिंसा पसरविण्याचे काम करत असतात हे बर्याचवेळा लक्षात आले आहे. ही बाब लक्षात घेत, कोंबिंग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक यांच्याकडे केली आहे.

# बाबुराव पोटभरेंचा यथोचित सन्मान



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष मा. बाबुरावजी पोटभरे यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने लंडन येथील अभिवादन सभेत सहभाग घेवुन मायदेशी परतले असता माजलगाव येथील श्रावस्ती बुद्धविहारात युवा नेते सचिन जावळे मित्र मंडळ यांच्या वतीने ५० किलोचा हार घालुन बाबुरावजी पोटभरे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला असता प्रसंगी सचिन जावळे मित्र मंडाळाचे मारोती साळवे, विलास भाग्यवंत, वैभव जावळे, संजय जावळे, शेख रफिक, विशाल धापसे, आकाश घुगे , बाबासाहेब दाभाडे, सन्नी टाकणखार , युवराज जावळे , प्रितम साळवे, आविष्कार भिसे, सुनिल आलझेंडे , अर्जुन भिसे, सुधीर टाकणखार, रोहित टाकणखार, राहुल भद्रे, अजय जावळे , विजय सुतार , चेतन फंदे यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# केज शहरात दत्त जयंती उत्साहात!

## धोरण:स्वर्गिय राहुल मुंडे प्रतिष्ठानचा उपक्रम



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरातील शिक्षक कॉलनी भागातील कर्तबगार युवक राहुल प्रकाश मुंडे यांचे काही दिवसांपूर्वी दुःखद अपघाती निधन झाले आहे.राहुल मुंडे हा कर्तबगार युवा तरूण होता.त्याच्या अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. राहुल मुंडे चा मोठा मित्र परिवार आहे.या सर्व राहुल च्या जिवलग मित्रांनी राहुल मुंडे प्रतिष्ठान ची स्थापना केली आहे. राहुल प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस या तरुण युवकांनी राहुल प्रतिष्ठानची स्थापना करताना व्यक्त केला होता.याकामी त्यांना एम.डी घुले सर, अशोक भैया तांदळे, गायकवाड सर, मुळे सर, सुर्यवंशी दादा सर, राजसाहेब ढाकणे, गोटू पाळवदे, वैभव केंद्रे, संदीप भुतडा, अशोक घुले, डॉ विजयकुमार धस, अशोक आंधळे , गोविंद काळे,व इतर अनेक मान्यवरांनी समर्थ साथ दिली आहे. याचाच एक भाग म्हणून आज दत्त जयंती निमित्ताने शिक्षक कॉलनी भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गरजवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींना वह्या व पुस्तकाचे वाटप करण्यात आले. सर्व प्रथम दत्त जयंती निमित्ताने पुजन करून व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वह्या व पुस्तकाचे वाटप कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे पान २ वर...

# निवडणूकांवर प्रश्नचिन्ह केला उपस्थित

## खा.रजनी पाटील:इव्हीएम हटाव स्वाक्षरी मोहि



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुका नुकत्याच संपल्या व या निवडणुकीचे निकाल अनपेक्षित आल्याने निवडणुका खरच लोकशाही पद्धतीने होत आहेत का ? असा प्रश्न कॉँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई पाटील यांनी बोलताना विचारला. केज येथे आयोजित करण्यात आलेल्या इव्हीएम हटाव स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड जिल्हा कॉँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी मंत्री अशोक पाटील हे होते. ईव्हीएम हटाओ देश बचाओ, संविधान बचाओ हे अभियान भारतीय कॉँग्रेस पक्षाने सुरू केले असून या अभियानाची सुरुवात बीड जिल्हयात करण्यात आली याचा शुभारंभ केज येथे करण्यात आला बोलताना खा. रजनीताई पाटील यांनी सांगितले की देशात व विशेषतः महाराष्ट्रात महायुतीच्या विरोधात जनतेचा कौल होता, जनभावना विरोधात होती अनेक पोल देखील महायुतीच्या विरुद्ध होते तरीही यापूर्वी कधीही मिळाल्या नाही येवढ्या मोठ्या प्रमाणात जागा भाजप व मित्र पक्षाच्या येतात याचा अर्थ इव्हीएम् मद्ये काहीतरी गडबड आहे आणि म्हणून कॉँग्रेस पक्षाने हे पान २ वर...

मागणी

## पप्पु कागदेंचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

# मस्साजोग घटना अमानविय असून आरोपींना फाशी द्यावी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अमानविय असून घटनेतील सर्व दोषींना कठोर शिक्षा व्हावी. तसेच परभणी येथे माथेफीरुने संविधानाची विटंबना केली आहे. त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. परभणी पोलिस आंबेडकरी वस्त्यांमध्ये कोबिंग ऑपरेशन करुन तरुणांवर गुन्हे दाखल करत आहेत. हा प्रकार तातडीने थांबविण्यात यावा. आशा मागणीचे निवेदन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या सागर निवासस्थान, मुंबई येथे शनिवार (ता.१४) रोजी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केज तालुक्यातील मस्साजोग येथील माजी सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन त्यांची अमानविय हत्या घडवून आणली आहे.परिणामी जिल्ह्यासह राज्याचे वातावरण ढवळून निघाले आहे.त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्येतील सर्व दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी तपास पारदर्शकपणे केला जावा.त्याचबरोबर या प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या पोलिसांवर देखील कडक कारवाई करण्यात यावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात पप्पु कागदे यांनी असंही म्हंटले आहे की, परभणी जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात असलेल्या संविधान प्रतिची एका माथेफीरुन विटंबना केली आहे.त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.कारण संविधान देशाच्या सर्वोच्चस्थानी आहे, जर कोणत्याही व्यक्तीकडून संविधानाचा अवमान होत असेल तर त्याची गय केली जाऊ नये.अशी मागणी केली असून पोलिसांकडून आंबेडकरी वस्त्यांमध्ये सुरू असलेले कोंबिंग ऑपरेशन आणि नाहक दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात यावेत. अशी मागणी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात पप्पू कागदे यांनी केली.

# महाकाली मंदिरात दत्तजयंती



दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील विठ्ठल–रखुमाई मंदिरा शेजारी असलेल्या महाकाली मंदिरात दत्तजयंती च्या निमित्ताने शनिवारी श्रीदत्त जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त विविध धार्मीक कार्यक्रम संपन्न झाले आणि महाप्रसादाचे आयोजन मंदिराचे पुजारी सतिश महाराज पांचाळ सह भक्तगणांनी केले होते.

मित्ती मार्गशीर्ष शु. १४ शके १९४५ शनिवारी सकाळी रांगोळी, फुलांची सजावट करुन श्री दत्तात्रेय व महाकाली देवीचा अभिषेक, पुजा केल्यानंतर दुपारी १२ वाजता महाआरती व ०१ वाजता महाप्रसादाला सुरूवात झाली. सायंकाळी सहा वाजता श्रीदत्त जन्माला भाविक भक्तांनी फुलांची उधळण करीत, दिगांबरा दिगांबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा, अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त महाराज कि जय चा जयघोष केला.